## प्रकरण दुसरे

## गोविन्दाग्रजांची प्रेमकविता

## गोविन्दाग्रजांची प्रेमकविता

प्रेमवृत्ती ही चिरंतन - सनातन असल्यामुळे जगाच्या पाठीवरील प्रत्येक समाजात प्रेमभावना ही आढळणारच आणि मग स्वाभाविकपणे त्या समाजाच्या साहित्यात तिचा हुंकारही उमटणारच. प्रेमवृत्तीच्या या सार्वकालीनतेमुळे आणि सार्वलौकिकतेमुळे ती कवितेमध्ये आधिक्याने प्रकट - होणार. प्रत्येक समाजातील साहित्यात प्रेमकविता हे निर्मितीचे आदिपर्व असणार. इतकी ही प्रेमभावना मूलगामी आहे. मराठी प्रेमकवितेपुरते बोलावयाचे तर गोविन्दाग्रजांच्या आधी मराठीत प्रेमकविता पुष्कळ लिहिली गेली होती. तथापि प्रेमकवितेच्या निर्मिती- मध्ये गोविन्दाग्रजांचे काही आगळे - वेगळे स्थान आहे. उत्कट प्रेमभावनेचा आविष्कार हे त्यांच्या कवितेचे व्यवच्छेदक वैशिष्टय आहे. स्वत: गोविन्दाग्रजच सांगतात,

" प्रीतिदेविच्या पायांमधला कवि घुंगुरवाळा !
प्रीतिदेवता जरा हालता कवि करि गानाला ! "

[ " हृदयशारदेस " पृ. ३३ ]

## गोविन्दाग्रजांच्या जीवनचित्रासंबंधी थोडेसे -

राम गणेश गडकरी यांचा जन्म दि. २६ मे १८८५ साली गुजराथमधील गणदेवी येथे झाला. ते गणेशपंत आणि सरस्वतीबाई यांचे दुसरे अपत्य. गणेशपंतांना एकंदर चार अपत्ये - विनायक, राम, गोविन्द आणि शंकर ऊर्फ मंजुबाळ. गणेशपंत बडोदा संस्थानात तहसीलदार होते. त्यांच्या या नोकरीमुळे त्यांचे वास्तव्य नवसारी

व गणदेवी येथे झाले. राम गणेशांचे बालपण असे गुजराथेतील गणदेवी आणि नवसारी या ठिकाणी मोठया लाडात गेले. पण १८९३ मध्ये वडिलांचा आणि पुढे वर्षाच्या आतच धाकटा भाऊ गोविन्दाचा मृत्यू झाला. हे दोन्ही आघात इतके जबरदस्त होते की लालजी म्हणजेच राम गणेश पुरेपूर भेदरुन गेले. या आपल्या मृत धाकटया भावाचे नाव त्यांनी स्वत:ला " गोविन्दाग्रज " म्हणवून अमर केले आहे.

गडकऱ्यांचे मूळगाव रायगड जिल्ह्यातील सांगवी हे होय. ते कर्जत तालुक्यात येते. तेथे राम गणेशांच्या वडिलांची शेती होती. पती आणि पुत्र यांच्या निधनानंतर सरस्वतीबाई राम व मंजुबाळ यांना घेऊन सांगवीला आल्या. विनायकाला बडोद्यात काकाकडे ठेवण्यात आले. इकडे मुलांच्या शिक्षणासाठी सरस्वतीबाईंनी कर्जतला बि-हाड केले. नऊ ते पंधरा हे माणसाच्या आयुष्यातील कोवळया वयाचे दिवस राम गणेशांनी कर्जत येथे पाहिले. लालजी मूळचा लाडावलेला. तसा व्रात्यच. शाळेत गेला तरी अभ्यासात लक्ष नसायचे. कृष्णाजी भिकाजी जोगळेकर हे त्यावेळी कर्जतच्या शाळेचे हेडमास्तर होते. त्यांनी रामला वळणीवर आणून त्याच्या मनात मराठी, संस्कृत आणि इंग्रजी साहित्याचे प्रेम पेरले. या जोगळेकरांसंबंधी गडकरी मोठया कृतज्ञ भावनेने म्हणतात, " माझ्या आयुष्याची जडण - घडण जर कोणी केली असेल, तर ती जोगळेकर मास्तरांनीच. फार काय, पण आज हा उभा केलेला गडकरी, हे त्यांच्याच कृपेचे मूर्तिमंत प्रतीक आहे. "

१८८५ ते १८९४ गणदेवी व नवसारी, १८९४ ते १९०० कर्जत अशा दोन स्थित्यंतरानंतर सरस्वतीबाई राम गणेश व मंजुबाळ यांना

घेऊन पुण्यास आल्या. राम गणेश " न्यू इंग्लिश स्कूल " मध्ये शिकू लागले. कर्जतला जोगळेकरांनी राम गणेशांच्या ठिकाणी संस्कृतची आवड निर्माण केली होती. त्यामुळे मॅट्रिकच्या परीक्षेमध्ये जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलर बनण्याची आकांक्षा गडक-यांच्या मनात रुजली होती. ही स्कॉलरशिप मिळवण्याइतपत तयारी झाली नसल्याने ते १९०३ साली मॅट्रिकच्या परीक्षेला बसले नाहीत. १९०४ साली ते मॅट्रिक झाले, पण साहित्याचा, विशेषत: नाटकाचा छंद लागल्यामुळे त्यांना जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिप मिळू शकली नाही. या काळात "नाट्यकला प्रवर्तक मंडळी" आणि शंकरराव पाटकर ही त्यांची दैवते बनली होती. " किर्लोस्कर नाटक मंडळी "ची नाटकेही ते पाहत होते. श्रीपाद कृष्णांचे " मूकनायक " हे नाटक तेथे त्यांनी पाहिले आणि त्यांना नाट्यगुरू लाभला.

कोल्हटकरांसारखे नाटककार व पदवीधर दोन्ही व्हायचे असे ठरवून राम गणेशांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये एफ्.वाय्.च्या वर्गात नाव दाखल केले. आपला मुलगा आता पदवीधर होणार असे वाटून आईने सीताबाई नामक मुलीबरोबर त्यांचे लग्न केले. लग्न केले, आता नोकरीही हवी म्हणून गडकरी " ज्ञानप्रकाश " दैनिकाचे वार्तहर झाले. मातोश्रीने शोधून काढलेली सून सीताबाई ही एक अशिक्षित आणि सामान्य स्त्री होती. थोड्याच अवधीत ती गडक-यांना सोडून गेली. कुंकू लावले व पुसले इतकाच सीताबाईंचा गडक-यांशी संबंध आला. गडकरीही एफ्.वाय्.च्या परीक्षेत नापास झाले. पत्नी निघून गेली, शिक्षण सुटले अशा वैतागाने त्यांनी १९०५ मध्ये घर सोडले. त्यांच्या मनात आत्महत्येचे विचार घोळत होते. कुर्डुवाडीला कोल्हटकर

त्यांना भेटले आणि त्यांच्यामुळे गडकरी किर्लोस्कर नाटक मंडळीत मुलांचे मास्तर म्हणून सामील झाले.

या काळात नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी द्वाररक्षकाचे कामही त्यांनी केले. शंकरराव मुजुमदारांनी गडक-यांच्या मदतीने " रंगभूमी " मासिकाचा पहिला अंक १९०५ मध्ये प्रसिध्द केला. १९०८ मध्ये भर पंक्तीत कोणीतरी अपमान केला म्हणून गडकरी कंपनीतून बाहेर पडले. प्रधान नामक आप्ताच्या खटपटीने त्यांना बाळापूरच्या " अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल " मध्ये शिक्षकाची नोकरी मिळाली. ते बाळापूरला जेमतेम एक महिना राहिले. खामगाव - नागपूर - अमरावती असे ते फिरत राहिले. अमरावतीस भांगले नावाचे गडक-यांचे एक मित्र " कर्तव्य " साप्ताहिक चालवीत. त्यात स्फुटलेखन करीत गडक-यांनी सुमारे ५ - ६ महिने काढले. पण शेवटी चुकलेला फकीर मशिदीत या न्यायाने ते, मुजुमदारांच्या पत्रावरून, १९०९ मध्ये विजापूर येथे " किर्लोस्कर नाटक मंडळी"त दाखल झाले.

आता गडकरी कंपनीचे नाटककार बनले होते. त्यांच्या " गर्वनिर्वाण " नाटकाच्या तालमीही कंपनीत सुरू झाल्या होत्या. पण नाशिक मुक्कामी कंपनीच्या " शारदा " नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी कलेक्टर जॅक्सन याचा अनंत कान्हेरे याने नाटयगृहातच खून केला. त्यामुळे आपले राजकीय स्वरूपाचे " गर्वनिर्वाण " हे नाटक गडक-यांनी जाळून टाकले. १९०९ सालापासून " गोविन्दाग्रज " या नावाने त्यांच्या कविता मासिक " मनोरंजन "मधून प्रसिध्द होऊ लागल्या. १९१० ला गडक-यांनी पुन्हा एकदा किर्लोस्कर कंपनी सोडली.

उपजीविकेचे साधन हवे म्हणून त्यांनी आधी 'ज्ञानप्रकाश'मध्ये आणि नंतर 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्ये नोकरी स्वीकारली. 'ज्ञानप्रकाशचे' बातमीदार म्हणून केवळ पंधरा-वीस दिवस ते राहिले आणि शाळेतही फक्त सहाच महिने टिकले.

गडकऱ्यांना पदवीधर होण्याचा ध्यास लागला होता. पदवीधर झाल्याशिवाय आपल्याला नाटककार म्हणून मान मिळणार नाही असे त्यांना वाटत असावे. १९११ साली ते पुन्हा फर्ग्युसनचे विद्यार्थी बनले. या काळातच त्यांनी 'प्रेमसंन्यास' नाटक लिहिले. गडकरी नाटककार झाले आणि एफ्.वाय्.च्या परीक्षेतही उत्तीर्ण झाले. इ.सन १९१२ ते १८ हा गडकऱ्यांच्या आयुष्यातील साहित्य सृजनाचा सुवर्णकाळ होय. नाटककार, कवी आणि विनोदी लेखक म्हणून त्यांना खूप प्रसिध्दी मिळाली. १९१७ साली मातोश्रींच्या आग्रहाखातर गडकऱ्यांनी रमाबाईंशी दुसरा विवाह केला. वास्तविक यावेळी त्यांची प्रकृती खूपच ढासळली होती. आश्चर्य म्हणजे २०-९-१९१८ रोजी 'इंदुप्रकाश'ने त्यांच्या निधनाची बातमी छापली होती. गडकऱ्यांनी मरणापूर्वीच आपल्या मरणाची बातमी वाचली. पुढे लवकरच दिनांक २३ जानेवारी १९१९ या दिवशी विदर्भातील सावनेर येथे गडकऱ्यांचे निधन झाले. जन्म गुजराथेत, कर्तृत्व पुण्यात आणि मृत्यू विदर्भात अशी गडकऱ्यांच्या जीवनाची त्रिस्थळी यात्रा झाली.

गडकऱ्यांनी 'प्रेमसंन्यास', 'पुण्यप्रभाव', 'भावबंधन' आणि 'एकच प्याला' ही संपूर्ण चार नाटके लिहिली. 'गर्वनिर्वाण' हे आपले नाटक त्यांनी जाळले आणि 'राजसंन्यास' व 'वेड्यांचा

बाजार' ही त्यांची नाटके अपूर्ण राहिली. 'बाळकराम' व 'सवाई नाटक्या' या नावानी त्यांनी विनोदी लेख लिहिले आणि 'गोविन्दाग्रज' नाव धारण करून काव्यसृजन केले. त्यांच्या काव्य-लेखनास प्रारंभ नवसारीत झालेला दिसतो. त्यांनी पुण्यात आल्यावर प्रारंभी 'नदीस पूर आलेला पाहून', 'मोगऱ्याचा हार', 'काळ', 'कोणी कोणास तरी', ह्या कविता लिहिलेल्या आहेत. त्यांचा 'पानिपतचा फटका' 'काळ' मध्ये प्रसिध्द झाला. १९०८ मध्ये 'सगुण स्वरूप' आणि 'नट मित्रास पत्र' या कविता लिहिलेल्या दिसतात. तथापि गोविंदाग्रजांच्या काव्यकर्तृत्वाची खरी सुरुवात 'अल्लड प्रेमास' या त्यांच्या कवितेपासूनच मानणे योग्य होईल. ती त्यांची भावोत्कट अशी पहिली कविता होय.

गडकऱ्यांचे चरित्र अनेकांनी लिहिले आहे. श्री.कोठीवाले[१], माधव गडकरी[२], लोही[३], अधिकारी[४] यांनी त्यांचे जीवनचरित्र सांगितले आहे. प्र.सी.गडकरी[५] यांनी त्यांच्या आठवणी संकलित

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. कोठीवाले वि.ना., "गडकरी जीवनचरित्र", उषा प्रकाशन, पुणे. १९७०.
२. गडकरी माधव, 'राम गणेश गडकरी.' श्री विद्या प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९८५.
३. लोही म.ना., "रा.ग.गडकरी: एक दर्शन", नूतन प्रकाशन, पुणे, १९८५
४. अधिकारी गो.गो., "गडकरी यांच्या आठवणी व चरित्र" अधिकारी आणि मंडळी, पुणे, १९२८.
५. गडकरी प्र.सी. "कै. राम गणेश गडकरी यांच्या आठवणी" के.भी.ढवळे, मुंबई, १९४४.

केल्या आहेत. तथापि आपल्या शोध विषयाच्या दृष्टीने आवश्यक तेवढाच चरित्राचा भाग वर मी नोंदलेला आहे. गडकऱ्यांच्या प्रेमकवितांच्या अभ्यासात त्यांच्या नैराश्याला कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या ते कळण्यास त्याची मदत होणारी आहे.

## काव्यसंख्या आणि वर्गीकरण

गोविन्दाग्रजांच्या " वाग्वैजयंती "मध्ये १३६ कविता संकलित केल्या गेल्या आहेत. शिवाय १३ अप्रकाशित कविता परिशिष्ट दोनमध्ये जोडलेल्या आहेत. अशाप्रकारे त्यांच्या एकूण १४९ कविता आपणांसमोर आहेत. त्यांतील काही कविता अपूर्ण आहेत, तर काही त्रुटित स्वरूपाच्या आहेत. काही कविता प्रासंगिक स्वरूपाच्या आहेत, तर काही रूपांतरित किंवा अनुकरणात्मक आहेत. गोविन्दाग्रजांच्या कवितांत गूढ-गुंजनात्मक, विनोदात्मक, तत्वज्ञानात्मक, सामाजिक व्यक्तिपूजात्मक स्वरूपाच्या कविता आढळत असल्या, तरी तिचा मोठा प्रान्त प्रेम-विषयक कवितांनी व्यापला आहे. प्रेमाशी संबंधित अशा पन्नासहून अधिक कविता त्यांनी लिहिलेल्या आहेत आणि गोविन्दाग्रजांच्या लोकप्रियतेचे प्रेमकविता हेच खरे अधिष्ठान आहे. त्याअनुषंगानेच त्याना " प्रेमाचे शाहीर " असे म्हटले गेले आहे.

गोविन्दाग्रजांच्या एकतृतीयांशाहून अधिक कविता या प्रेमकविता आहेत. प्रेमवृत्ती ही त्यांच्या कवितेची स्थायीवृत्ती आहे. 'वाग्वैजयंतीत' या प्रेमवृत्तीची अनेक रूपे आढळून येतात. त्यांच्या प्रेमकवितेतील या विविधरूपांची पाहणी करणे प्रथमारंभी योग्य होईल.

## प्रेमास सावधगिरीचा सल्ला -

गोविन्दाग्रजांना आपल्या जीवनात अनेक कटू अनुभव आलेले होते. त्यात ते अतिशय भावुक आणि संवेदनशील असल्यामुळे लहान - सहान अपमानांनी दुखावले जात. आपण त्यांच्या चरित्राचा जो संक्षिप्त आढावा घेतला आहे त्यात ते एकाजागी कुठे स्थिर राहिलेले दिसत नाहीत. जीवनात असे कटू अनुभव येत गेल्याने त्यांनी आपल्या " अल्लड प्रेमास " या जगात जपून चालण्याचा सल्ला दिला आहे. ही कविता १९०९ मध्ये लिहिली गेली आहे. यावेळी गोविन्दाग्रज साधारणपणे चोवीस वर्षांचे होते. या जगात भोळ्या जीवाची दारूण वंचना होते. जग त्याची फसगत करते आणि म्हणूनच आपल्या प्रेमाला ते सांगतात,

" कोणी तुजला मानिल खोटे,
  तिरस्कारही दिसेल कोठे,
  अपमानाचेही भय मोठे
बाग जगाची, ही न फुलांची, काटे जागोजाग !
  टाकिल कुणि तुज धिक्काराने,
  रडविल किंवा उपहासाने,
  फसविल नकली की मालाने,
कोणी भटकत, उगाच रखडत, फिरविल मागोमाग । "

आपण आपली खरी प्रेमभावना व्यक्त करू जाणार आणि जग तिच्या खरेपणाबद्दल संशय घेणार, यापेक्षा ती भावना मनातल्यामनात

कोंडून ठेवणेच कवीला इष्ट वाटते आणि म्हणूनच तो आपल्या प्रेमाला सावधगिरीचा इशारा देत सांगतो,

" म्हणुनि लाडक्या! कुठे न जाई,
या हृदयातचि लपुनी राही,
योग्य मित्र नच सुख तरि नाही!
कुसंगतीहुनि, वेड्या! मानी, फार बरा एकांत! "

हे सगळे जग केवळ देखाव्याचे आहे. इथे सारे स्वार्थाचे गुलाम आहेत. हे जग म्हणजे केवळ शुध्दत्वाचे स्मशान आहे. त्यामुळे या जगात शुध्द भाबड्या आणि सरळ अशा तुला मुळीच किंमत असणार नाही. हे जग अफाट असले तरी अगदी संकुचित आहे. या जगात तुझा पाड लागणे शक्य नाही. आणि म्हणूनच गोविन्दाग्रज या अल्लड प्रेमाला सावधगिरीने वाटचाल करण्याचा आणि संयमाचा सल्ला देतात.

जगाच्या स्वार्थी वृत्तीमुळे विश्रब्ध प्रणयाची वंचना होत असते, याची गोविन्दाग्रजांना जाण आहे. " दुर्दर्शन " या कवितेत ते सांगतात की, अन्य अनेक अनर्थकारी दैवघटितांनी एकवेळ आपले चित्त खिन्न होणार नाही, पण आपल्या स्वार्थपरतेमुळे जेव्हा सौंदर्य मोठ्या विश्वासाने आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या प्रेमाची वंचना करते त्यावेळी मन अतिशय खिन्न होते --

" नाना रोग, जुगुप्सिता, व्यसनिता विच्छिन्न प्रेतावलि,
भूकंपादि अनर्थ, दैवघटिते ही सर्वही पाहिली,
त्यांही खिन्न न चित्त होत, परि ते होते सदा ज्यापरी
विश्रब्ध प्रणयास वंचित यदा सौंदर्य स्वार्थास्तव! "

या जगात मोरपिसावरचे फसवे डोळे सर्वत्र आढळतात. आणि त्यांनी भोळ्या जीवांची फसवणूक होत राहते. गोविन्दाग्रज जगाकडून होणा-या अशा फसवणुकीमुळेच प्रेमाला आपल्या हृदयातच लपून राहण्यास सांगत आहेत.

निरभिलाष प्रेमवृत्ती

प्रतिसादाची कोणतीही अपेक्षा न करता केलेले प्रेम सुखी राहण्याची शक्यता आहे. अपेक्षा ठेवली तर अपेक्षाभंग होण्याचा धोका असतो. त्यामुळे अपेक्षा किंवा अभिलाषा न बाळगता केले जाणारे प्रेम उच्च प्रतीचे ठरते. प्रेमाच्या या निरभिलाष अंगाचा गोविन्दाग्रजांच्या, कवितांत अनेक ठिकाणी उल्लेख येतो. त्यांची " दिव्य प्रेमाची जाती " प्रीतीच्या या उदात्त आणि निरभिलाष अंगाचे दर्शन आपणांस घडविते. ही कविता गोविन्दाग्रजांनी १९१४ मध्ये लिहिलेली आहे. सामान्य व्यावहारिक प्रेमापेक्षा दिव्यप्रेमाची पातळी अगदी निराळी असते. या प्रेमाला स्थलकालांची मर्यादा नसते किंवा शक्याशक्यतेची आडकाठी नसते. अनंत योजने दूर असलेल्या आकाशातील तारकेवर, पृथ्वीवर राहून जे प्रेम केले जाते ते दिव्यप्रेम होय. या प्रेमामध्ये प्राप्तीची कसलीही आशा नसते आणि तरीही आपल्या सा-या भावना तिच्यात केंद्रित झालेल्या असतात. या दिव्यप्रेमाची ओळख करून देत गोविन्दाग्रज सांगतात -

" तारा गगनी
परि भूवरुनी;
बघता नयनी
जी संचरते हृदयी, ती
दिव्य प्रेमाची जाति ! "

या दिव्यप्रेमामध्ये देवघेवीची भाषा नसते. खरे म्हणजे या प्रीतीला तिळभरही मोबदला नको असतो. जन्मापासूनच ती निरभिलाष असते. या प्रीतीचे स्वरूप स्पष्ट करीत कवी सांगतात -

" न मिळे अवसर अभिलाषा।
" दे घे " ची नाही भाषा।।
जिच्या जिवाला
तिळ मोबदला
नकोच कसला;
निराश जन्मापासुनि ती
दिव्य प्रेमाची जाति।। "

चंद्राला पाहून कुमदिनी विकसतात, सूर्याला पाहून फुले उमलतात, पण चंद्राला आणि सूर्याला त्याच्या पत्ताच नसतो. चंद्र वरच्यावर फिरत असतो आणि चंद्रकांत मणी खाली पाझरत असतो. दिव्य प्रीती ही अशा जातीची असते. तिच्यात " निरभिलाष तन्मयता " असते. गोविन्दाग्रजांनी " दिव्य प्रेमाची जाती " या आपल्या कवितेत उदात्त, निरभिलाष प्रेमाविषयीचे आपले तत्वज्ञान मांडलेले आहे.

गोविन्दाग्रजांची " चिमुकलीच कविता " एका नाजुक, सुंदर, गोंडस, चिमण्या, दशवर्षा बालेचे वर्णन करते. या कवितेत त्यांनी पावन आणि विशुध्द भावाचा मोठा गौरव केला आहे. बालमनातील या पवित्र भावनेचा गोविन्दाग्रजांना सोस दिसतो. कवी म्हणतात -

" बालभाव मनि विमल, जोडि करयुग परमेशाला,
अहा! कोणता भाव असे हा पापमना न कळे।

शुध्द भाव हा तिच्याच मनिच्या पुण्याचा वारा,
हाच भाव, भगवंता! आता जगत्त्रयी पसरा."

गोविन्दाग्रज या बालिकेचे " जे पावन, जे विशुध्द, त्याची तू मंगलमूर्ति " असे वर्णन करतात. त्यांनी निरभिलाषतेचा, पापहीनतेचा, पावनतेचा, विशुध्दतेचा आपला आग्रह असा ब-याच ठिकाणी व्यक्त केला आहे.

## प्रेमाचा महिमा

गोविंदाग्रजांनी आपल्या अनेक कवितांत प्रेमाचा महिमा सांगितला आहे, प्रेमाचा गौरव केलेला आहे. " प्रेमपाठ " या कवितेत त्यांनी आपल्या चित्तकोकिलाला पंचप्राणांचा पंचम स्वर लाऊन प्रेमाचे गीत गायला सांगितले आहे. निसर्गातील प्रेमक्रीडांची अनेक चित्रे रंगवीत " हृदयशारदेस " ते म्हणतात ---

" हृदयशारदे! हृदयि राहुनी करि मज प्रेमकवी।
तुझ्या प्रीतिची स्फूर्तिच मज हा प्रेमपाठ शिकवी।
पशूस करशिल मानव! मानव नेशिल देवपदा!
देवपणा स्थिर देवांचाही राखिसि तूच सदा।
प्रेमतरंगे चित्त तरंगे, आत्माही रंगे।
जगत् रंगले, विश्व रंगले एक प्रेमरंगे। "

पुढे जाऊन गोविन्दाग्रज प्रेमानेच जग चालते असे सांगतात. जीवाला खरे जीवपण येते ते प्रेमामुळेच होय, असा त्यांचा सिध्दान्त आहे. ते म्हणतात ---

" प्रेम नसे तर जीव नको हा! प्रेमे जग चाले।
प्रेमावाचुनि धिग् जीवन हे असे आज झाले। "

" प्रेमाखातर " या कवितेचा नायक एक प्रेमवीर आहे. हा प्रेमवीर पावसाळ्यात आपल्या प्रेमळ संजीवनीला भेटावयास निघाला असता त्याचा मित्र त्याला न जाण्याचा उपदेश करतो. मित्राचा उपदेश या प्रेमवीराला मान्य होत नाही. तो मित्राला म्हणतो,

" हटतिल डोंगर, तटतिल सरिता ना आपोआप,
झटतिल मेघहि साह्य कराया धरूनि इंद्रचाप!
गिरिशिखरांची पडेल खाली मोडुनिया मान;
प्रेमापुढती सांग कुणाचा टिकतो अभिमान ?
प्रेमे बोले, प्रेमे डोले, प्रेमे जग हाले;
प्रेमाखातर जगी आजवर काय नाहि झाले ? "

हा प्रेमवीर प्रेमासाठी मोठमोठ्या माणसांनी कायकाय केले त्याचा पाढाच आपल्या मित्राला वाचून दाखवत आहे. या प्रेमासाठीच सीता रामापाठोपाठ वनवासात गेली आणि वृन्देस्तव हरी स्मशानातला वृन्दावनवासी बनला. या प्रेमासाठीच रामाने समुद्रावर सेतू बांधला आणि कृष्णाने आपल्या नखावर गोवर्धन पर्वत तोलला. या प्रेमामुळेच पहिल्या बाजीरावाने भिन्नधर्मीय मस्तानीला राणी करून घेतले आणि जगन्नाथ पंडिताने प्रेमासाठीच धर्मावर लाथ मारली. प्रेमाचा हा प्रभाव अखंड चालत असल्याचे तो आपल्या मित्राला सांगतो. " ती कोण ? " या कवितेमध्ये जीव हा प्रेमावर जगत असतो असे पुनश्च सांगितले आहे. या कवितेत

9024

गोविन्दाग्रज सांगतात,

" दूरस्था जलधीकडे स्वहृदया नेते नदी वाहुनी,
शोधाया रसिकास नित्य कविता हिंडे, न आशा तुटे;
भूलोकावर राहते कुमुदिनी चंद्राकडे पाहुनी,
रात्रीमागुनि धावतो दिवसही, की भेट व्हावी कुठे ?
जीवाचे जगणे असेच असते सापेक्ष प्रेमावरी। "

मानवी जीवितात प्रीतीचे असे अनन्यसाधारण महत्त्व आहे. गोविन्दाग्रजांनी या प्रीतीचे अनेक ठिकाणी स्तवन केलेले आहे. या प्रेमामुळेच मानवी जीवन समृध्द होते, सफल होते. या प्रेमाच्या प्राप्तीने जीवन सरस आणि सुखद बनते - हा भाव त्यांच्या कित्येक कवितांत व्यक्त झालेला आहे.

जीवनात प्रेमाला असे महत्त्व असल्यामुळे मनुष्य आपल्या हृदयात आपल्या प्रेमचित्राला अतिशय जपून ठेवत असतो. गोविंदाग्रज अस्म-रसाने आपल्या हृदयाच्या पडद्यावर असेच एक प्रेमचित्र रंगवितात. हे प्रेमचित्रच त्यांच्या " हृदयाच्या हृदयातिल " शिलालेख बनते. ते " अस्म " कवितेत सांगतात,

" त्या चित्राचा, त्या पडद्याचा, मम गाना धीर,
त्या चित्रातिल देवीचा मी विकला शाहीर!
मरता मी, तो जपाच माझ्या हृदयाचा पडदा,
त्या देवीचा झालो अगणित जन्मांचा बंदा!"

सारभिलाष प्रेम

क्वचित् दिव्य निष्काम प्रेमाचा आढळ होऊ शकेल, नाही असे नाही. परन्तु प्रेमाचा महिमाच असा आहे, की त्याकडे माणसाने सहजगत्या आकर्षित होऊन जावे. मानवी मनोधर्मच असा प्रेमाकडे ओढला जाणारा. स्त्रीचे सौंदर्य कितीही सात्त्विक असले तरी, सुंदर स्त्रीच्या सान्निध्यात येणाऱ्या मनुष्याच्या मनात नेहमी सात्त्विक आणि उदात्त विचारच निर्माण होतील असे नाही. उलट त्याच्या मनात अभिलाषेचा थोडाफार भाग निर्माण होण्याची शक्यताच अधिक. व्यवहारात अशीच गोष्ट घडताना दिसते. निसर्गसौंदर्याच्या दर्शनाने जेथे अनेकांच्या मनात अभिलाषांची विलसिते काहूर करतात, तेथे चैतन्याने रसरसलेल्या व भावनांनी मुसमुसलेल्या स्त्रीच्या आकर्षक सौंदर्याच्या अवलोकनाने पाहणाऱ्याच्या चित्तात शारीरिक अभिलाषेची ओझरती झुळूक वाहत राहिली, तर ते चुकीचे म्हणता येणार नाही. गोविन्दाग्रजांच्या अनेक कवितांत या सारभिलाष प्रेमाचे चित्रण झालेले दिसते. " फुले वेचिली पण -" या कवितेत कवीने पन्हाळगडावर हिंडत असता अनेक रानफुले गोळा केली. त्यांच्या सुगंधाने कवी हर्षोत्फुल्ल झाला, पण या सुंदर फुलांचे काय करावयाचे असा प्रश्न त्याच्यापुढे ठाकला. कवी प्रश्न करतो -

" फुले, वेचिली; पण - आता ही द्यावी कोणालागी ?
राक्षसवृत्ति स्मरणदेवता क्षणात झाली जागी.
हतभागी हा जीव एकला; प्रीतिदेवता नाही,
मोडुनि पडले हृन्मयमंदिर शतधा आघाताही ।

निष्प्रेमाचे जीवन माझे स्ध चिंतनी जावे,
संकल्पचि हा वरला ठरला; का ते दैवा ठावे!"

गोळा केलेल्या फुलांनी कवीचे हृदय प्रणयरसाने उचंबळून येते आणि त्याच्या मनोमानसी प्रीतिदेवतेची अभिलाषा निर्माण होते. या साभिलाष प्रेमाच्या दृष्टीने " ओसाड आडातील एकच फूल " ही कविता मोठी लक्षणीय आहे. एका जुनाट, पडक्या आणि ओसाड अशा आडामध्ये निर्जनस्थळी हे फूल उमललेले होते. आडाच्या तोंडावर वेलींच्या पानांची गर्दी झाल्याने या फुलाला बाहेरचा वारा असा लागतच नव्हता. त्याचे तोंड नेहमी पाण्याकडे वळलेले असे. एकदा चुकून आलेल्या सूर्यकिरणांनी त्याला पाण्यात आपले प्रतिबिंब दिसले. आपल्या डोळयांत आशा एकवटून एकाग्रतेने ते आपल्याच प्रतिबिंबाकडे पाहात राहिले. त्याचा तो नादच होऊन बसला. कवी सांगतात --

" त्या चित्राप्रति भावबध्दनयने आशाद्दृशा पाहणे -
हा नित्यक्रम भाबडया सरळ त्या माझ्या फुलाचा असे;
त्याला सर्वहि वाहणे, विरुनिया त्याच्यामध्ये राहणे,
आशा एकच एवढी मनि सदा वेडया फुलाच्या वसे. "

या फुलाची वृत्ती त्या प्रतिबिंबाशीच एकरूप झाली. हे हसल्यावर प्रतिबिंबातील फूलही हसले आणि त्याला आपल्या प्रेमाला मिळालेला तो प्रतिसादच वाटला. आपली जोडी जमणार या कल्पनेत ते रंगू लागले ---

" माझा भाव तयाप्रती कळतसे " मानीत हे बापडे;
जोडीचा महिमा असा चहुकडे; धिक् सर्व जोडीविणे।

लाभे जोड तरी कुणास न स्थे शून्याततेही जिणे ?"

जोडी जमली, तर त्या शून्यातही आपले जीवन रुचिर बनवण्याची या फुलाची उत्कट अभिलाषा या कवितेत व्यक्त झाली आहे.

" वेडा " या कवितेतील वेडा आपल्या डोक्यात चांदणीचे वेड घेऊन बसलेला दिसतो. " हृदयशारदेस " या कवितेत कोपी कवी आपल्या हृदयशारदेस म्हणजे प्रणयिनीस " तू दूर राहू नको " असे कळवळून सांगतो आहे. आपला जीव करपलेला आहे. असे असता " प्राणरक्षिणी ! न का येत कीव ?" असे तो तिला विचारतो आहे. तिचा प्रणयगोलच त्याच्या मर्त्य जीवाला वाचवू शकत होता आणि म्हणूनच तो तिला विनवतो आहे,

" ध्यास मांडिला तुझा असा हा असह्य विरहाने.
कधि येशिल, कधि घेशिल मजला हृदयी प्रेमाने ?
प्रीतीने रंगली पावले हृत्पटि नाचीव;
प्रेमामृत पाजुनी, देवते! भक्ता वाचीव।"

" हुरहुर " या कवितेत जे दृष्टीला दिसू शकत नाही, ज्याची वास्तवात प्रतीती येत नाही त्याची आशा करीत बसलेला नायक आपणाला दिसतो. तो वार-यावर उंची मनोरे बांधण्याची भाषा करतो आहे. त्याचे सामर्थ्य तर अनेक मर्यादांनी खुजे झाले आहे. तथापि दुष्प्राप्य गोष्टीच्या प्राप्तीची अभिलाषा करीत तो विचारतो आहे --

" माझे होईल सर्व हे कधि, मला जे आजला पारखे ?

माझे चित्रच नाचवीन नयनी माझ्या कधी सारखे ?"

साभिलाष प्रेमाची अशी चित्रे गोविन्दाग्रजांच्या कवितांत जागोजाग आढळतात.

## निराश प्रेमाचे चित्रण

गोविन्दाग्रजांच्या कवितांतील नायक हा प्रेमप्राप्तीसाठी तळमळतो आहे. पण अद्यापि त्याचे ईप्सित साध्य झालेले नाही. त्याला सा-या जगात विकसन-चाललेले आढळते. या जगात नष्ट होणा-या वस्तू फिरून उदयाला येतात. अस्तंगत सूर्य सुप्रभाती पुन्हा उदयाला येतो. वद्यपक्षातील मावळत्या-चंद्राला शुक्लपक्षात पुन्हा पूर्णत्व प्राप्त होते. वर्षाऋतू पुन्हा वेळच्या वेळी येतो आणि विजेचा नाच चालू होतो. वसंतऋतूत वृक्षाला पुन्हा पालवी फुटते. सागराला ओहोटी नंतर पुन्हा भरती येते. दयाघनाला हा नायक विचारतो,

" या मदीय चिरनिराश। जीवन्मृत माणसास
पुनरपि उमलावयास। काल दिला कोणता ?"

[ पुनर्विकसन ]

हा नायक त्या शुभकाळाची वाट पाहतो आहे. पण तो त्याच्या दृष्टीच्या टप्प्यात येत नाही. " एखाद्याचे नशीब " या कवितेत तो देवाला सांगतो की, काही गोडफुलांना स्वर्गांगनांच्या शिरी, रसिकाच्या हृन्मंदिरी किंवा प्रभुपदी स्थान लाभते. पण एखाद्या फुटक्या नशिबाच्या फुलाला प्रेताला शृंगारावे लागते. एखादा पर्वत शीतल हिमप्रभा आपल्या शिरी धारण करतो, एखाद्याच्या उदरातून

मोठया निर्मल नद्या जन्माला येतात, तर एखाद्याला फुललेल्या वनदेवतेचे सान्निध्य लाभते. परन्तु एखादा अभागी पर्वतातून ज्वालानदी वाहते. मेघ काही वृक्षांवर जलवृष्टी करून त्यांना पानाफुलांनी मोहरून टाकतो, मात्र एखादा वृक्षावर विद्युत्पात होतो. हा नायक प्रेतास शृंगारणा-या फुलाशी, ज्यातून ज्वालानदी वाहते आहे अशा पर्वताशी आणि विद्युत्पाताने जळणा-या वृक्षाशी जणू आपले सादृश्य शोधतो आहे. तो देवाला म्हणतो,

> " चाले खेळ असा जगात; बहुधा सौख्यात सारे जरी,
> एखादा पडतो तसाच चुकुनी दु:खार्णवी यापरी
> पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असे आपला,
> देवा ! तू तरि टाकि वरूनी, त्यासाठि तो तापला ।"

गोविन्दाग्रजांच्या कवितेत गडद निराशेची अशी जी चित्रे येतात त्याची काही कारणे सांगता येतील. मनुष्य केवळ स्वप्नावर जगत असेल तर त्याच्या नशिबी ही निराशा हमखास येणार. कारण सत्याच्या इवल्याशा झुळकीने त्याच्या स्वप्नांचा ईमला कोसळल्याशिवाय राहणार नाही. माणूस काही अपेक्षा बाळगून असतो, पण त्या पूर्ण झाल्याचे पाहणे त्याच्या नशिबी येत नाही. हा अपेक्षाभंग निराशेचे दुसरे कारण होय. पुष्कळदा माणूस विश्वासावर विसंबून राहतो, परन्तु त्याच्या विश्वासाला धक्का बसणा-या गोष्टी घडतात. ही वंचना माणसाच्या दु:खाचे तिसरे कारण होय. आणि कधीकधी माणसाला अकारणच उदासीनता घेरून राहते. तिचे निश्चित कारण त्याच्या लक्षात येत नाही. थोडक्यात, स्वप्नाळूवृत्ती, अपेक्षाभंग, वंचना आणि अकारणता या गोष्टींनी माणसाचे जीवन निराशेने काळवंडून जाते. गोविन्दाग्रजांच्या कवितेत या सर्व प्रकारांतील निराशेचा हुंकार ऐकू येतो.

माणसाने वस्तुस्थितीकडे पूर्ण डोळेझाक करून अमर्याद वेड्या आशा आपल्या उराशी कवटाळल्या, तर त्यांचे पर्यवसान निराशेतच होणार. " महती आशा , तीव्र निराशा " हे जीवनातील कटू सत्य आहे. " पाखरास " या कवितेत गोविन्दाग्रज त्याला म्हणतात,

" चढया लकेरीसरशी जावे देवाजीच्या घरा ।।<br>
सोबत घ्यावी तव पंखांची उडती पळती त्वरा ।।<br>
क्षण - सहवासे जीव कोंडला होत असा बावरा ।।<br>
परंतु सारा निर्धन मनिचा स्वप्नभास हा खरा ।।<br>
विषण्ण मानस; उदास जीवन; पीत निराशागरा ।।<br>
हृदय तडफडे दु:खाग्नीने मुकले सुखसागरा ।।<br>
मिळता लघु सुख अधिक सुखाचा जीव सदा हावरा ।।<br>
तीव्र निराशा होता होइल फार कि रे घाबरा ।।

माणसाच्या चित्ताला कधीकधी अप्राप्य गोष्टींचा ध्यास लागतो. पण त्याच्या आशांचा चक्काचूर होण्यातच त्याची अखेर होते. " भयाण एकांत " या कवितेत गोविन्दाग्रज म्हणतात,

" महती आशा, तीव्र निराशा, द्वंद्व हृदयि करिती<br>
एकीमधुनी दुसरी निपजे, खळ नाही कशि ती । "

आपल्या सहचरीबाबत माणसाच्या काही कल्पना असतात. गोविन्दाग्रजांचा नायक हृदयाला दिव्याची स्फूर्ती देईल अशी प्रेमाची मूर्ती शोधत होता. अशी एक तथाकथित जीवनदेवी त्याला लाभली आणि जेव्हा त्याने तिच्याकडे पाहिले, त्यावेळी आपण आंधळे असतो तर बरे असा तो विलाप करू लागला. " सौंदर्य अप्रतिमा " अशी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

सखी आपल्याला भेटेल या अपेक्षेने, निराशेमुळे अंध झालेल्या या नायकाने तिच्याकडे दृष्टी टाकली,

" कृष्णवर्ण हा- प्रमाण काही अवयवास या मुळि नाही ।।
कुसुम दर्शनतापद असली बाला ही पुढती राही ।।
दृष्टि लाभता मूर्तिभंग हा - मनोभंगही जन्माचा ।। "

या अपेक्षाभंगामुळे तो सदा अंधत्वास्तव विलाप करु लागला. अपेक्षाभंगाने मनुष्य असाच निराश होतो.

वंचनेमुळे निर्माण झालेल्या निराशेची " वाग्वैजयंतीत " बरीच उदाहरणे आलेली आहेत. प्रियेच्या पावलांसाठी हृदयाच्या पायघड्या पसराव्यात आणि तिने नटव्या थाटापाठी त्याला खुशाल तुडवून जावे असा भलता अनुभव गोविन्दाग्रजांच्या नायकाला येतो. निराशेने तो या निर्दय बालेस म्हणतो,

" जगावाचुनी लाभतीस तरि जग मी केले असते
तुझ्यावाचुनी जग हे आता असून झाले नसते ।
दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नावा
परतायाचे नाही आता त्या प्रेमाचा गावा
होइल होइल वाटत होते तेच अखेरिस झाले
नाव घेतल्यावाचुन आता मनात झुरणे आले "

" निर्दय देवीस " या कवितेतही अशाच वंचनेचे चित्र आले आहे. ती आपला हात आपल्या हातात देईल अशी नायकाची कल्पना, पण तिने त्याची फसगत केली. या कवितेत वंचनेचे गडद चित्र उमटले आहे. तो

तिला म्हणतो,

प्रेमयाचना करिता देशी हातहि हातात
गमले नव्हते की तू करशिल असा पुढे घात।
त्या हृदयाची माती माती या परि केलीस,
कल्पनेत मम शिल्प आता पाहत बसलीस।
का हसली निर्दये, दावुनी प्रीति अशी फसवी ?
तव शरि मरणारांची तळमळ काय तुला हसवी ?
करकमळांची दळे दळांशी लावितास अंग,
सर्वस्वाच्या भेटीचा तो गमे पूर्वरंग।
प्रेमांधाचा परि विश्वासे धरुनि असा हात,
टाकिलेस त्या नैराश्याच्या भयाण डोहात।"

पण निराशेला अपेक्षाभंग, वंचना यासारखे कारण नेहमी लागतेच असे नाही. हळुवार संवेदना असलेला कवी अकारणही निराश होऊ शकतो. " हाय हाय।" या कवितेत या अकारण निराशेचे चित्र आढळते. आपले पाय दिक्कालांनी आणि अज्ञातांनी बांधलेले आहेत, असे वाटून एकलकोंडे कविमन धाय धाय रडू लागते. हा कवी पृथ्वीला पायाखाली तुडवीत असला तरी त्याला पृथ्वीचे आकर्षण सोडवत नाही. त्याच्या मनात कुणीतरी नवलाचे सूर गाते आणि मग त्याला हुरहूर लागून राहते. तो म्हणतो,

" मनात माझ्या कुणी गातसे नवलाचे सूर।।
मलाच ऐकू येति न; नुसती लागे हुरहूर।।
माझे गाणे ते ऐकुनि मी व्हाया बेभान।।
एकसारखा करितो माझ्या जीवाचा कान।।
हाय हाय ते ऐकू येत न; झालो हैराण।। "

" येते काही जाते काही - मी नुसता बघतो " अशी ही अकारण हुरहूर आणि निराशा आहे.

आशा - निराशेचा खेळ

माणूस कुणावरतरी प्रेम करू लागतो, त्या प्रेमी व्यक्तीकडून आपल्याला प्रतिसाद मिळतो आहे असे वाटून त्याच्या मनात आशेचा अंकुर निर्माण होतो, पण पुढे आपल्या प्रेमाबद्दल त्याला स्वत:ला शंका यायला लागते. तो तिची याचना करू लागतो. तिच्या एका शब्दाच्या प्रतिउत्तरासाठी कासाविस होतो. कधी त्याच्यात कडवटपणा निर्माण होतो, तर कधी तो स्वत:ला सावरण्याचा प्रयत्न करतो. अखेर आपल्या निष्प्रेमाची जाणीव होऊन तो मरणालाही जवळ करू पाहतो. प्रेमानुभवाच्या या सर्व छटा " वाग्वैजयंती"त आढळतात.

नायकाच्या मनामध्ये कोणीतरी आपल्या आयुष्यात यावे असा भाव निर्माण होतो. त्याच्या लक्ष्यशून्य हृदयात तशी आशा स्फुरू लागते. पण मनातले हे रहस्य त्याच्या ओठांपर्यंत आले तरी ते सांगायचे कोणाला असा त्याला प्रश्न पडतो. अशा देवीशी भेट घडवून आणण्याची तो देवाला प्रार्थना करू लागतो. तो म्हणतो,

" ओठांशी भिडते रहस्य मनिचे - सांगू कुणाला परी ?
अश्रू हे नयनीहि - माळ करुनी घालू कुणाच्या गळा ?
आले हे भरुनी रिते हृदयही - देऊ कुणाच्या करी ?
आला दाटुनि कंठ - हाय ! रडुनी कोठे करू मोकळा ?

जी माझ्यास्तव, मी जिचे सकलही; आधार जी जीवनी
देवा ! भेटवि - दाखवी तरि मला ती कोण देवी जनी ? "

[ ती कोण ? ]

अशी देवी त्याच्या जीवनात येते. तो तिला याचना करू लागतो. " त्याच तारकेस याचना ", " निर्वाणीची विनवणी ", " एका शब्दासाठी विनंती " या कवितांत या याचनेचे स्वरूप व्यक्त झालेले आहे. कुणि " तारका " स्वर्गसुखाची आशा लाऊन त्याला ओढू लागते आणि तो तिला " उच्चतेस या योग्य न मी तरि स्वप्रेमे सावरी " अशी याचना करू लागतो. तिने त्याला काही गोडवचने दिलेली असतात, त्यामुळे पर्युत्सुक होऊन तो तिला " आणि वल्लभे ! दिलीस वचने; गोड अहा ती किती तरी । खरी कधी होणार परी ।" असे विचारू लागतो. पण तिच्याकडून अपेक्षित प्रत्युत्तर मिळत नाही.

बरे, या प्रेमापासून दूर रहावे असेही घडत नाही. प्रेमविषया-पासून आपल्या प्रीतीची उत्कट व शरणागत उत्सुकता लपवून ठेवणे या नायकाला अशक्य बनते. त्याचा एक बुध्दिमान मित्र याबाबतीत गुप्तता राखण्याचा नायकाला सल्ला देतो. पण आपली प्रीती अशी झाकता येणे शक्य नसल्याचे तो त्याला स्पष्टपणे सांगतो. व्यवहाराच्या-दृष्टीने विचार करू लागलो, तर प्रीती सुखावह होत नाही असे या नायकाचे पालुपद राहते. " प्रेमाची प्रामाणिकता " या कवितेत हा नायक मित्राला म्हणतो,

दळादळाची पुरी खुलावट फूल उमलते जरी करी ।।
रसिक भ्रमरा तरीच वाटे गुंगावेसे तदंतरी ।।

मेघाआडुनि रविकिरणे जरि स्पष्ट दर्शने नच देती ।।
फुले खालती काय उमलती ? किंवा रसरंगा येती ?

प्रस्तुत नायक आपल्या हृदयाचे उघडपणे दान करू इच्छितो आहे. अश्रुजलासह आपले हृदय अर्पण करणे हा एकच पुण्यमार्ग त्याला वाटतो. पण नायकाचे हे हृदयार्पण त्याच्या प्रेमिकेकडून प्रत्युत्तर मिळवू शकत नाही. तो आशा - निराशेच्या झोल्यावरच तरंगत राहतो.

गोविन्दाग्रजांच्या कवितेत आशानिराशेच्या खेळाचे हे चित्र चांगल्या प्रकारे प्रतिबिंबित झालेले आहे. " ---- स " या कवितेतील प्रेमला नायकासाठी प्रेमाने फुले पाठवून देते. ही फुले कोमेजली तरी त्यांच्याशी प्रेमाची स्मृती आजन्म जडून राहील याचा त्याला आनंदच होतो. अशा गोष्टींनी त्याची आशा पल्लवित होत राहते. तथापि अजून त्याला तिच्या प्रेमाची निश्चिती वाटत नाही. त्याच्या मनात आशा-निराशेचा लपंडाव चालूच राहतो. " मनातली दिवसरात्र " या कवितेत हृदयीच्या या लपंडावाचे सुरेख चित्रण आढळते. हा नायक म्हणतो,

" फिरे दिनभरी रवि; प्रकट होई संध्या पुढे,
गमे उदयकाळशी, रविच तो बिचारा बुडे ।
तशीच मनि सारखी वरिवरीच आशा चढे;
गमे क्षणच जाहली सफल, तोच खाली पडे ।"

- - - - - - - - - - - -
- - - - - - - - - - - -

" असे सतत चालते जनि तसे मनी सारखे;
असे हृदयि आज जे गमत ते उद्या पारखे ।

नको दिवसरात्र ती न सरती कधी जी पहा.
सरेल कधि तो सरो हृदयिचा लपंडाव हा।"

या नायकाच्या जीवनात असा एक क्षण येतो की " हा क्षण " अनंत सौख्याचा आदिकाल तरी होईल किंवा त्याचा अंत तरी करील. या पर्यायात " हा क्षण " नायकाच्या सौख्याचा आदिकाल ठरू शकला नाही हे त्याचे दुर्दैव होय.

नायकाच्या हृदयातील आशा-निराशेचा चाललेला हा तुंबळ संग्राम मोठा जीवघेणा आहे. कधी त्याला आपला प्रेमओघ अखंड भरून वाहत आहे असे वाटत राहते आणि " मरण हे झूट " असा आत्मविश्वास त्याच्या ठिकाणी निर्माण होतो. आपण दोघे मिळून आपल्या हाती परमेश्वरही आणू असा दुर्दम्य विश्वास त्याच्या ठिकाणी निर्माण होतो. " पुनर्जात प्रेमास " या कवितेत तो म्हणतो,

" क्षणभर वाटत होते मजला,
की तव ओघ आटुनी गेला,
परि जो अखंड भरला त्याला
कशाची तूट ? - चल उघड, झाकली मूठ।"

" मी तू दूर न राहू आता
दाखवु शक्ती अपुली जगता,
आणू परमेश्वरही हाता
ऊठ रे ऊठ - चल उघड, झाकली मूठ।"

पण अशी अवस्था फार काळ राहात नाही. " हृदयास " या कवितेत तो आपल्या सौंदर्याची संभावना करु लागतो. त्याला " चंचल, लहरी, रंग बेगडी " असे हिणवू लागतो. हे सौंदर्य "कमअस्सल जातीचे " आहे, असे त्याचे व्यंग दाखवू लागतो. आपल्या हृदयाला हा नायक म्हणतो,

" जिवलग हृदया ! मूढ वृत्ति ही धारण केली का असली ?
लाथ मार त्या चंचल जगता - प्रेमाची सोंगे कसली ।
नटव्या सोंगामागे लागे जे, त्या सौंदर्यासाठी
नवलाखाचे मोल देसि का ? कशास या आटापाटी ?
जिथे गुणांची चाड न काही - कमअस्सल जे जातीचे;
सौंदर्यचि ते कसले ? - केवळ एक बाहुले मातीचे ।"

पण अशी किती नावे ठेवली तरी मूळचा पाश कसा सुटणार ? उलट आपल्या प्रेमाला हिणवल्याबद्दल प्रियेची क्षमायाचना करण्याचा प्रसंग येतो. तो तिला सांगतो,

" क्षमा करी, जिवलगे ! क्षमा करि ! न लाविता अवधि ।।
कोमल हृदया कठोर वचनी छळि हा अपराधी ।।"

या " एका शब्दासाठी विनंती " या कवितेत पुढे नायक सांगतो की, तुझ्याशिवाय मला काही सुचतसुचत नाही आणि माझ्याशिवाय तुझीही तशीच अवस्था झाली आहे. आपण परस्परांसाठी आहोत असा दोघांनाही प्रत्यय आला आहे. त्यामुळे कोणी कोणाचा राग धरु नये. तो तिला विचारतो,

" जे झाले ते विसरूनि, सखये! टाकुनि इतराजी ।।
भला बुरा मी मान्य करूनिया होशिल ना माझी ? ।।"

शेवटी " होइल होइल वाटत होते तेच " होऊन जाते. प्रिया नायकाच्या हृदयाला तोडून नटव्या थाटापाठी निघून जाते. आता नायक जग निर्माण करणा-या देवाला आणि हे जग ज्या प्रेमावर चालते त्या प्रेमाला जाळण्याची भाषा करू लागतो. इत:पर प्रेमाच्या गावाचे नावही न उच्चारण्याचा निश्चय करीत तो " निर्दय बालेस " म्हणतो,

" जगावाचुनी लाभतीस तरि जग मी केले असते ।।
तुझ्यावाचुनी जग हे आता असून झाले नसते ।।।
दिला तिलांजलि अश्रूंचा हा त्या प्रेमाच्या नावा ।।
परतायाचे नाही आता त्या प्रेमाच्या गावा ।। "

इतके दिवस दोघांनी परस्परांचे पदर आणून विणलेला प्रेमाचा " गोफ " आता विस्कटणेच प्राप्त होते. एरव्ही एखादी गोष्ट तोडणे सुकर असते, पण येथे प्रेमबंधन तोडावयाचे आहे. प्रेमिक आपल्या प्रियेची अजीजी करत म्हणतो,

" हळूहळू ओढणे हळू जरा, ओढायची का घाई ? ।।
भलता धागा ओढिताच तू जीव जिवलगे, हा जाई ।। "

प्रेमनिराशेनंतर या नायकाला आता भीषण एकांत प्रिय वाटतो आहे. त्याचे हृदय उदासीनतेने आरपार भरून गेलेले आहे. त्याला आता झोपही पारखी झाली आहे. कारण आता त्याच्या हृदयाला कोणतेही

भविष्य उरले नाही. " अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस " या कवितेत तो सांगतो,

" निद्रा कुठली परि त्या हृदया, भविष्य नाही ज्यास ?
हाती संसाराची माती,
मनिच्या आशा मनीच खाती
भूतकाळची भूते रडती !
मिटल्या जाग्या डोळ्यांपुढती शून्याचे मैदान।
निष्प्रेमाची शेज सोबती,
भयाण दुनिया सारी भवती,
विषण्ण येती विचार चित्ती,
बाह्यांतर विश्वात खेळते उदासीनता एक। "

निष्प्रेम जीवनामुळे निर्माण होणारी असह्य व्यथा ■■ ओळींत व्यक्त झालेली आहे. आता नायकाला स्मशान हेच आपले शांतिस्थान वाटू लागते. जगातल्या सजीवतेच्या चाळ्याला आता तो कंटाळला आहे. त्याचा त्रास चुकविण्यासाठी शांतपणाचे रूप असलेल्या स्मशानाची त्याला ओढ लागलेली आहे. [ स्मशानातले गाणे ] " आधीच भीषण निशा तम त्यात घोर " अशा भयाण पार्श्वभूमीवर त्याला घुबडाचे ओरडणे आता आकर्षक वाटत आहे. [ रात्रीस ओरडणाऱ्या घुबडास ]. नायकाचे हृदय भीषण उदासीनतेने भरल्यामुळे त्याला आता ज्या कल्पना सुचतात त्याही भीषण आणि भयानक असतात. बालकवींचा " अरूण " कुणीकडे आणि गोविन्दाग्रजांचा " अरूण [ दुसरा ] " कुणीकडे ? पूर्व क्षितिजावर तांबूस रंगाच्या होणाऱ्या शिडकाव्यावर अन्य कवींनी

मोठया रम्य कल्पना केलेल्या आहेत. आमच्या नायकाला मात्र या तांबूस रंगात भीषण चित्रे दिसतात.

किंवा कोमल बाला मेली तीव्र निराशांनी,
हृदया फोडुनि तिच्या प्रीतिची लाट चढे गगनी ।
मुक्याच इच्छा, आशा झाल्या कोणाच्या खाक,
रागाने ही लाल जाहली का त्यांची राख ?

. . .

रविकिरणांचे भाले शिरले आकाशापोटी,
रक्ताचे शिंपणे करी का जखम अशी मोठी ?

भीषण काळोखांतील भयानक एकांतात रमू पाहणाऱ्या या नायकाच्या वृत्तीत एकूण मानवी जीवनाविषयी असा काही कडवटपणा निर्माण झाला आहे की, त्याला याहून मरण अधिक चांगले वाटू लागते. गोविन्दाग्रजांनी १९१६ मध्ये निराश प्रेमाच्या व्यथा व्यक्त करणारी जी गीते लिहिली आहेत त्यांमध्ये अनेक ठिकाणी ही मृत्यूची ओढ आढळते. " कलगीचे गाणे " या कवितेत " सुख मरणाचे सापडले " असे सांगितले गेलेले आहे.

गोविन्दाग्रजांचा हा नायक " महती आशा " बाळगून प्रेमप्राप्तीसाठी झगडत राहिला, पण त्याच्या नशिबी " तीव्र निराशाच " आली. " शेवटचे प्रेमगीत " गाण्याचा दुर्धर प्रसंग त्याच्यावर गुदरला. या कवितेत तो म्हणतो,

" यत्न केले सखे । रत्न तुजसारखे । कधि तरी व्हावया प्राप्त हातां ।
अन्य घटना तरी नाकळे का करी । देव की दैव की तो विधाता ।।।

जन्म हा व्यर्थता होत। होवो तसा। सर्वथा शिवपरा ईशसत्ता।
प्रेमयज्ञाप्रति प्रथम ही आहुति। अपरिहार्यचि जी जीवजाता।।
एक आशा उरे - [तीच परि मज पुरे]। तिजसवे जीव करि एकमयता।
"जन्मजन्मांतरी एकदा क्षणभरी। प्रेम लाभो तुझे शोकघाता।। "

वर मांडलेले सारे प्रसंग कुणा एकाच नायकाच्या जीवनात निर्माण झाले आहेत अशा त-हेने मांडणी केली गेली आहे. वास्तवात गोविन्दाग्रजांचे प्रत्येक गीत हे पृथक् भाववृत्ती व्यक्त करणारे आहे. त्याच्या गीतांतील सर्व भाववृत्ती एकाच नायकाच्या जीवनात निर्माण झाल्या असे म्हणणे अवास्तव ठरण्याजोगे आहे. परन्तु माझ्या वर्ण्य-विषयाच्या दृष्टीने या भाववृत्तीच महत्त्वाच्या असल्यामुळे त्या एकाच नायकाच्या जीवनात निर्माण झाल्या असे दाखविल्याने त्या अधिक स्पष्ट होतील असे वाटून मी ही क्लृप्ती योजिली आहे. माझ्या दृष्टीने नायक एक असो किंवा अनेक असोत गोविन्दाग्रजांच्या विविध भाववृत्तींचा आविष्कार हा महत्त्वाचा आहे.

## ' वाग्वैजयंती ' तील मधुराभक्ती

गोविन्दाग्रजांनी " मुरली " या कवितेत मधुराभक्तीचे चित्र उपस्थित केलेले आहे. या कवितेच्या प्रस्तावात ते सांगतात, " प्रीती, भक्ती आणि मुक्ती या भावयोगाच्या तीन पाय-या आहेत. प्रीतीच्या परमोच्च स्थितीवरच भक्तीचे पहिले पाऊल उमटून भक्तीच्या मोकळ्या भरारीत भक्त-भगवंतांचे पूर्णैक्य होत असते, हे दाखविण्यासाठी स्त्रीहृदयाचे प्रेमळ रहस्य ओळखून भागवत कवींनी " राधा गौळण " कृष्णपरमात्म्या-

समोर उभी केलेली आहे. जगाच्या भूतकाळात भोळया भाबडया भक्तिप्रीतीच्या संयोगाचे इतके ठळक चित्र या व्यतिरिक्त इतरत्र सापडणार नाही."

गोविन्दाग्रजांची ही कविता १९१२ च्या सप्टेंबरमध्ये प्रसिध्द झाली आहे. प्रीतीच्या प्रकर्षातूनच भक्तीचा उदय होत असतो असे गोविन्दाग्रजांना या कवितेत सांगावयाचे आहे. या कवितेतील राधिका म्हणजे भक्त आणि मुरली म्हणजे परमेश्वरी कृपेचे प्रत्युत्तर होय. या कवितेच्या काही कडव्यांत प्रेमभावनेच्या विकासाच्या विविध अवस्था प्रकट झाल्या आहेत. उत्कट प्रेमातील बेभानपणा, प्रियमीलनाची अनिवार उत्कंठा, तिच्याशी एकरूप पावण्याची अभिलाषा, अशा एकरूपतेमुळे निर्माण होणारी उन्मनी अवस्था आणि या अवस्थेत प्राप्त होणारा दिव्य आनंद या प्रेमभावनेच्या उत्तरोत्तर विकसित होणा-या अवस्था या कवितेत व्यक्त झाल्या आहेत.

गोविन्दाग्रजांची ही कविता त्या काळात अतिशय लोकप्रिय झाली होती. श्रीकृष्णाची मुरली ही अनेक कवींचा काव्यविषय झालेली आहे. पण मुरलीवरील विशेष गाजलेल्या आणि रसिकांना वेड लावून गेलेल्या अशा कविता दोनच - एक गोविन्दाग्रजांची " मुरली " आणि दुसरी " गोविन्दांची ". या दोहींचे स्वरूप मात्र मूलत: भिन्न आहे. या दोन मुरली गीतांतील फरक स्पष्ट करीत कुसुमाग्रज सांगतात, " गोविन्दाग्रजांची मुरली प्रणयाधिष्ठित आहे, तर गोविन्दांची मुरली राष्ट्रीय स्वातंत्र्याकांक्षेचा जळजळीत उच्चार करणारी आहे. पहिल्या मुरलीतील कृष्ण यमुनेच्या काठी

चांदण्यात रासक्रीडा करणारा " नंदलाल " आहे, तर दुसरीतील कृष्ण कालियासर्पाच्या मस्तकावर नाचणारा " मुरारी " आहे। गडकरी स्वत:ला प्रेमाचे शाहीर म्हणवीत. तेव्हा राधाकृष्णांतील अद्भुत प्रणयाचे गीत " मुरली "च्या स्वरातून त्यांना ऐकू यावे हे साहजिकच होय. " १

## मुग्ध शृंगाराचा आविष्कार

गोविन्दाग्रजांच्या " गुलाबी कोडे " आणि " चिरे जळिगार..... " या दोन कवितांत मुग्धशृंगाराची मनोज्ञ चित्रे आपल्यापुढे येतात. सूर्यास्ताच्या वेळेला पश्चिम दिग्भागी आकाशात तांबूस छटांचे शिंपण होते. पण त्याचवेळी पूर्वदिशेलाही आरक्त छटा दिसून येतात. एक मुग्धबाला निजनाथाला विचारते,

" अपरा वदनी रमते लाली रविसहवासाने,
रवि नसता परि का रंगावे प्राचीच्या वदने ?
रंग इकडचा तिकडे वळला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणि कधी कशी केली ? "

तिचा नाथ तिच्या लोभसवाण्या शंकेचे निरसन तितक्याच लोभसवाण्या कृतीने करतो. तो तिच्या एका गालाचे चुंबन घेतो, त्यामुळे तिच्या चुंबन घेतलेल्या गालावरच गुलाबी छटा पसरते असे नाही, तर तिचा

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. 'पिंपळपान,' संपादक कुसुमाग्रज, प्रथमावृत्ती १९७०, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ २०९.

दुसरा गालही त्या छटेने रंगून जातो. आणि मग तिचे कोडे उलगडीत तिचा नाथ तिला सांगतो,

" रविबिंबासम चुंबन-बिंबचि विलसत या गाली।
सहज तयाची छटा गुलाबी पसरे भवताली.
चुंबनचित्र न परी उमटता या दुसऱ्या गाली,
सांग वल्लभे! नाचतसे का त्यावरि ही लाली।
रंग इकडचा तिकडे वठला, छटा कुठुनि गेली ?
ही जादूची नजरबंदि कुणि कधी कशी केली ?"

" अप्रकाशित गडकरी " या पुस्तकात गोविन्दाग्रजांची " विरे जळि गार...." ही कविता आता प्रकाशित करण्यात आली आहे. पतीशी झालेल्या पहिल्या शारीरिक मीलनाचा आपला अनुभव एक तरुणी आपल्या सखीला सांगत आहे. कालपर्यंन्त निरागस आणि अजाण असलेली ही पोर एका रात्रीत " थोर " होऊन जाते.

" विरे जळि गार। झडपिला धारिने हार।
गेल्या रात्री खेळत होती,
गाली, नयनी, हृदयावरती,
नाचत रोमांरोमांभवती,
सखे, ती लाज। कुणिकडे पळाली आज ?
रात्री होते अजाण पोर
एका रात्रित झाले थोर
माझ्या बालपणाचे चोर
बाई फार! नवलाचे जादूगार। "[१]

---

१. अत्रे प्र.के., 'अप्रकाशित गडकरी,' प्रथमावृत्ती १९६२, मोटे प्रकाशन, पृष्ठ १९.

## शारीर प्रेमाची अभिव्यक्ती

गोविन्दाग्रजांच्या कवितेत चुंबनाचे उल्लेख अनेकवार येतात. श्री चंद्रकान्त मार्तंड प्रधान यांनी " गडकरी आणि चुंबने!" नावाचा एक लेखच लिहिला होता.[१] "पहिले चुंबन " या कवितेला जोडलेल्या प्रस्तावनेत " पहिल्या चुंबनाची अजब जादू दुसऱ्यात नाही " असे गोविन्दाग्रज सांगतात. गोविन्दाग्रजांच्या कवितात हा जो " चुंबनमहिमा " आढळतो, त्यातून माणसाची शारीरिक मीलनाची ओढ व्यक्त होताना दिसते. " प्रेमकाळ " या कवितेत हृदयदेवतेस म्हटले आहे,

हृदयदेवते, दे हाता ।।
प्रेमकाळ निर्मू आता ।।
दृढ आलिंगन दे हृदया ।।
चुंबन देई नंतर त्या ।।
एक करू जीवा भावा ।।
प्रेमकाळ चल करू नवा ।।
प्रेमकामने! प्रेमचुंबने !! जोडु या मने ।।

सारे घरदार आणि चिंतेचा बाजार सोडून

" चुंबनेच घेऊ नुसती
सखे। सारखी; सोडु न ती ।।
काम एवढे मनी धरू ।।

---

१. गडकरी माधव, "राम गणेश गडकरी", प्रथमावृत्ती २६ सप्टेंबर १९८५, श्रीविद्या प्रकाशन, पुणे पृष्ठ १००.

जीवन चुंबनमयचि करु ।।
आता चुंबन। नंतर चुंबन। चुंबन जीवन ।। "

असे प्रियकर आपल्या हृदयदेवतेला सांगतो आहे. " मरणापर्यन्त चुंबन एक अनाघ्रंत " असा त्याचा सिध्दान्त आहे. " प्रेमपाठ " या कवितेत महासागर आणि नदी यांच्या चुंबनाचा निर्देश आला आहे. महासागराला उगाच लाटा उधळू नकोस असे सांगितले आहे. प्रेमाचे वारे पिऊन आपला वडवानल विझवण्याचा सल्ला दिला गेला आहे. आणि त्याला सांगितले आहे,

" नदीमुखाचे चुंबन घेता ज्या लाटा उठती,
त्याच तेवढया नाचू दे, त्या प्रेमपाठ गाती ।।"

" पहिल्या चुंबनाचा" मोठा महिमा गाताना कवी सांगतात -

" एकदाच अनुभव त्याचा। आरंभ अंत सौख्याचा। एकदा।
आयुष्य न त्याला क्षणही। जन्महि पुन्हा त्या नाही। एकदा।
मनि चटका लावायासी। पाठवी दैव जणु त्यासी। एकदा।
निशिदिनी। वाटते मनी। नित्य जन्मुनी।
मरण सोसावे। परि पहिले चुंबन घ्यावे। फिरुनिही।।"

गोविन्दाग्रजांनी " चुंबन " या शीर्षकाखालीच एक कविता लिहिली आहे. ही कविता केवळ दोन ओळींची असून अपूर्ण आहे -

" गाल रंगले चुंबनि परि मुख सखये, होत मलूल
खुलवि त्याच किरणाने करपत जणु जाईचे फूल। "

गोविन्दाग्रजांच्या कवितांत चुंबनादींचे असे जे उल्लेख येतात आणि वैषयिक प्रेमाच्या ज्या छटा आढळतात त्यांवरून रा.ग.हर्षे गोविन्दाग्रजांची दृष्टी विषयलोलुप असल्याचे सांगतात. ते लिहितात, " आपल्या दयितेची " निर्वाणीची विनवणी " करीत असताना " चुंबन दे रमणी " याच्या पलीकडे ज्याच्या हेतूची मजल जाऊ शकत नाही त्याच्या शुध्द प्रेमाचा कोणाला विश्वास येणार आहे. "[१] इतक्या सोवळेपणाने काव्याचा अभ्यास जर करावयाचा तर समीक्षकाच्या लेखणीच्या फटकाऱ्यातून प्रत्यक्ष भगवंतदेखील सुटेल की नाही अशी मला शंका आहे. गोविन्दाग्रज या चुंबननिर्देशातून चुंबनाचे विविध स्वरूप पाहत आहेत असे वाटते. कारण " मुरली " या कवितेत त्याचे आध्यात्मिक परिवर्तनही त्यांनी सांगून टाकले आहे. -

" श्वासे मज हृदयी भरवी ।। नादे की ओढुनि नेई ।।
चुंबने च की मज बनवी ।।
तव ओठांवरली लालि ।। कन्हय्या बजाव बजाव मुरली ।।"

## वस्तुनिष्ठ प्रीतीची अभिव्यक्ती

साहित्यामध्ये आत्मनिष्ठा आणि वस्तुनिष्ठा असे शब्द येत राहतात, परन्तु हे स्थूल स्वरूपाचेच वर्गीकरण आहे. कारण वस्तुनिष्ठेमध्ये आत्मनिष्ठा डोकावते आणि आत्मनिष्ठेलाही

---

१. हर्षे प्रो. रा.ग., " गोविन्दाग्रज ", प्रथमावृत्ती, साहित्य-सेवक-संघ, पुणे, पृष्ठ २७.

थोडाफार वस्तुनिष्ठेचा आधार असतो. गोविन्दाग्रजांच्या पुरते बोलायचे तर ही गोष्ट त्यांच्या कवितेत प्रकर्षाने जाणवते. " देवाची निर्दयता " या कवितेत त्यांनी कुब्जेची व्यथा व्यक्त केली आहे. गोकुळवासी जनांचे सांत्वन करण्यासाठी उध्दव गोकुळात आला आहे. प्रेमकथांच्या संस्मरणाने सा-या गोपी आणि त्यांच्यासमवेत राधाही व्याकुळ, विव्हळ झालेली आहे. परंतु अष्टावक्रा, काळी, कुबडी कुब्जा मात्र तेथे नाही, ती एकटीच कुठेतरी जाऊन बसली आहे. तोंड झाकून, ओठ दाबून मनातल्या मनात ती रडते आहे. तिला मोकळेपणाने रडताही येत नाही. ती म्हणते,

" प्रेमळ देवा, जिवलग देवा, माझ्या जीवाच्या देवा।
कसे विसरला या दासीला ? देवा हो, एकच देवा।
कशी विचारू उध्दवजींना क्षेम तुझे या लोकात ?।
म्हणेल कोणी काय मला हे त्या न कळे भर आनंदात ?।।
सुंदर गोपी योग्य रडाया जगन्मोहना तुजसाठी।
परी कुठे मी ? आणि कुठे तू ? लोकसुंदरा जगजेठी।।
रडायासही मुक्तकंठ हा देवा रे जीवचि लाजे।
श्रीहरिसाठी कुब्जा रडते हेच हसे होइल माझे। "

वस्तुत: कुब्जेचा गोकुळाशी काहीही संबंध नाही आणि कृष्णकृपेने तिचे अष्टावक्रत्वही आता राहिलेले नाही. परन्तु गोविन्दाग्रजांनी तिला गोकुळात कुब्जा रूपातच उभी केली आहे. कारण ते हसायलाच नव्हे, तर रडायलाही भाग्य लागते या कल्पनेने भारून गेलेले आहेत. कुब्जेच्या अशा स्थळरूपाच्या चित्रणाने त्यांना आपली कल्पना मात्र साकार करता आलेली आहे.

गोविन्दाग्रजांनी " कृष्णाकाठी कुंडल " या कवितेत एक गूढरम्य प्रेमचित्र उभे केलेले आहे. ऐतिहासिक घटनेचा आभास निर्माण करत रायबागचा राघू आणि मान्यांची मैना या प्रणयी जीवांची प्रेमकहाणी या कवितेत त्यांनी मूर्त केली आहे. ही मैना राघूला आपले मन बहाल करून टाकते. तो तिची समजूत काढू लागतो. आपले जीवन हे अनेक साहसांनी गजबजलेले वीराचे जीवन आहे, या उलट तिचे जीवन सुखाच्या समृध्दीने भरलेले आहे. असे असल्यामुळे तिने आपल्याबरोबर येऊ नये, असे तो तिला सांगतो -

" तुझ्या कपाळी सुबक बसावी बघ मोत्यांची जाळी;
करवंदीची काटे जाळी, परी आमुच्या भाळी.
रायगडावर उघडया पडल्या नव्या हि-यांच्या खाणी
नटेल त्यांनी रायबागच्या रायाजीची राणी
टकमक टोकावरी राहणे चढण उभी ती फार,
पडेल खाली बघता असली नाजुक नवतीनार. "

परन्तु आपल्या प्रीतीपुढे मैनेने या संकटांचा धाक मुळीच बाळगला नाही. ती त्याला म्हणते,

" प्रीतीच्या पंखांनी येइल टाकुनि मागे गगना
रायबागच्या राघूमागे ही मान्यांची मैना । "

दोघांची मने जुळली आणि त्यांनी परस्परांना प्रीतीची गोड वचने दिली. राघूचे जीवन एका कर्तबगार वीराचे जीवन होते. प्रीतीच्या मोहाने तो जखडला जाणारा नव्हता आणि मैनाही आपल्या मोहामध्ये त्याला बांधून टाकणारी नव्हती. कर्तव्यपालनासाठी तो तिचा निरोप

घेऊन स्वारीवर गेला. लढाईमध्ये राघूच्या जिव्हारी घाव बसून त्याला वीरमरण आले. ही भयंकर वार्ता ऐकून मैनेला अनावर शोक झाला आणि त्या शोकाघातातच आपली कुडी सोडून तिचाही प्राण राघूला भेटावयास उडून गेला. अशाप्रकारे

" ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही। " –

" कथाशेष " नावाचे एक खंडकाव्य लिहिण्याचे गोविन्दाग्रजांच्या मनात होते. अपूर्ण राहिलेले हे काव्य गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर १९४४ मध्ये समीक्षकाच्या गडकरी विशेषांकात प्रसिध्द झालेले आहे. गोविन्दाग्रज वर्णन करतात की देहाभवती अंधाराची अर्धी काळी छाया पसरली आहे. अशा वेळी गतकाळातील आठवणींची अंधुक, उदास माया जिवाला व्यापून टाकीत आहे आणि 'शाहीरी शराबाने धुंद होऊन' आपल्या एका मनाच्या मर्जीसाठी मी हा प्रीतीचा इतिहास लिहून ठेवत आहे. आपल्या या प्रेमकथेबद्दल ते म्हणतात –

" प्रेमकथा ही ऐकायाला नको रिकामा कान ।।
ज्याची त्याला दसलाखाची मुक्या मनाची तान ।।"

ही प्रेमकथा मिरजमळ्याच्या हिरवळलेल्या माळावर घडलेली दिसते. या कथेतील नायक स्त्रीहृदयातील संकोचवृत्तीचा खेळ आणि परिणाम या दोन्ही गोष्टी सांगतो आहे. ही स्त्रीहृदयातील संकोचवृत्ती जितकी कोमल तितकीच क्रूर आहे, प्रसंग साधून ती विरस करते आणि मनाला हुरहूर लावते अशी नायक येथे तक्रार करतो आहे. तिच्यामुळे " चुकल्या चित्ता चटपट " लागते आणि हृदय संशयाने हालत राहते.

या संकोचवृत्तिचा जसा आपला एकसारखा खेळ चाललेला असतो. प्रेम प्राप्तीसाठी तळमळणाऱ्या या नायकाला प्रियेच्या एखाद्या शब्दाचा प्रतिसाद मिळता, तर त्याच्या जीवनाला वेगळे वळण लागते आणि त्याच्या जीवनाचा घात टळला असता. तो म्हणतो,

" क्षणचि आणखी एक, शब्द वा एक दृक्पात ।।
जरी लाभता तरि हा चुकता असा मनाचा घात ।।"

गोविन्दाग्रजांची " प्रेम आणि मरण " ही एक रूपक कथा आहे. मनोरंजन मासिकाच्या एप्रिल १९१६ च्या वसंत अंकात ती प्रसिध्द झाली आहे. मैदानातील एका वृक्षाला एकदा आकाशात बिजली चमकताना दिसते आणि त्याक्षणीच त्या वृक्षाला तिचे वेड लागून, तिच्या प्राप्तीचाच तो ध्यास घेऊन बसतो. तसे पाहिले तर त्या मैदानातील असंख्य वेली या वृक्षाच्या प्रेमप्राप्तीसाठी तळमळत होत्या. पण दैवाची करणी काही विपरीतच. जवळच्या वेली सोडून ऱ्या वृक्षाच्या नजरेत भरली ती गगनातील चंचलबाला. तिने त्याला अक्षरश: वेड लावले. कवी सांगतात,

परि कमचि विंदान
काही तरि असते आन । चहुकडे ।
कोणत्या मुहूर्तावरती
मेघात वीज लखलखती । नाचली ।
त्या क्षणी । त्याचिया मनी । तरंगति झणी ।
गोड तरी जहरी । प्रीतिच्या लहरी । नकळता ।

तो वृक्ष तिन्ही त्रिकाळ तिचाच विचार करीत बसला. मुसळधार पावसाने त्याला टवटवी येईना, प्रचंड वाऱ्यानेही त्याचे पान हलेना आणि त्याला आलेल्या कळ्याही मुळीच फुलेनात. त्याची ही स्थिती पाहून " दीड वितीची दुनिया " वाटेल ते बडबडू लागली. स्वर्गातील देवही त्याला मनोमन हसू लागले. पण त्याने इष्काचा जहरी प्याला प्राशन केलेला होता. आपल्या प्रेमपूर्तीसाठी त्याने दीर्घ, कठोर तपश्चर्या आरंभिली. त्याच्या या कठोर तपश्चर्येने इंद्राला थरकाप सुटला, ऋषिगणांना आश्चर्य वाटले आणि ध्रुवबाळाच्या मनात मत्सर निर्माण झाला. त्याच्या या तपश्चर्येमुळे तपोदेवता साक्षात् त्याच्यापुढे येऊन उभी राहिली आणि वर माग [ "वरं ब्रूहि "] असे म्हणू लागली. तिने त्याला चिरंजीव कल्पवृक्ष किंवा प्रलयाच्या वेळच्या अक्षय वटवृक्षाचे भाग्यशाली पद बहाल करण्याचे आमिष दाखविले. यावर तो वृक्ष म्हणाला,

" देवि सर्व-दे, ! हेच एक दे - ।
भेटवी मजला । जीविच्या जिवाची बाला ।। एकदा ।।"

त्याच्या या वेड्या मागणीवर तेहतीस कोटी देवांनी त्याला हितगोष्टी सांगावयास सुरवात केली. आपल्या स्पर्शाने मरण आणणाऱ्या त्या जीवाच्या राणीचे घातकी वेड सोडण्याचा त्यांनी सल्ला दिला. त्या राक्षसिणीची मागणी सोडून, जे कधी कुणाला प्राप्त झाले नाही असे काहीतरी माग असे देवांनी सुचविले. देवांचा हा सल्ला ऐकून वृक्ष उपहासाने हसला आणि त्यांना म्हणाला,

" निष्प्रेम चिरंजीवन ते ।
जगि दगडालाहि मिळते ।। धिक् तयां ।।
क्षण एक पुरे प्रेमाचा ।
वर्षाव पडो मरणांचा । मग पुढे ।।"

वृक्षाचा हा निग्रह पाहून सर्व देवांचा निरुपाय झाला आणि त्यांनी गगनातील चंचलबाला त्याला भेटायला धाडून दिली. ती प्रीतीची जळती ज्योत उताविळपणे धावली आणि कडकडाट करीत त्याच्यावर कोसळली. तिच्या स्पर्शाने वृक्ष उन्मळला आणि दुभंगून खाली पडला. पण त्याच क्षणी एक मोठे आश्चर्य घडले. त्या वृक्षाच्या सर्वच्या सर्व कळ्या फुलून गेल्या आणि कायम करता खुलल्या. कवी वर्णन करतात,

" त्या क्षणी ।।
दुभंगून खाली पडला ।
परि पडता पडता हसला ।। एकदा ।।
हर्षाच्या येउनि लहरी ।
फडफडुनी पाने सारी ।। हासली ।।
त्या कळ्या सर्वही फुलल्या ।।
खुलल्या त्या कायम खुलल्या ।। अजुनिही ।।
तो योग । खरा हठयोग । प्रीतिचा रोग ।
लागला ज्याला । लाभते मरणही त्याला । हे असे ।। "

या कवितेमध्ये गोविन्दाग्रजांनी वृक्षाच्या एकनिष्ठ आणि अढळ प्रेमाचा गौरव केलेला आहे. पतंग आणि दीपक यांचे प्रेम

शतकानुशतके कवींच्या प्रेमादराचा विषय झालेले आहे. या कवितेच्या प्रारंभी होनाजी बाळाच्या " जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी । झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी ।। " या ओळीचा साभिप्राय निर्देश केलेला आहे. या कवितेने ज्योति - पतंग या परंपरागत न्यायाच्या जोडीला गोविन्दाग्रजांनी वृक्ष - बीज हा नूतन न्याय प्रस्थापित केला आहे. " प्रेम आणि मरण " या गोविन्दाग्रजांच्या कवितेला मराठी काव्यक्षेत्रात खरोखरच तोड नाही. भाऊसाहेब खांडेकरांना या कवितेत वर्णिलेली प्रीती भक्तीहून भिन्न वाटत नाही.

## गोविन्दाग्रजांचे प्रेमप्रकरण

गोविन्दाग्रजांचे प्रेमप्रकरण किंवा प्रेमप्रकरणे हा मराठी समिक्षकांमध्ये एक वादाचा विषय होऊन राहिला आहे. त्यांनी काल्पनिक प्रेयसी निर्माण करून आपल्या प्रेमकविता लिहिल्या, की वास्तवातच त्यांना एक किंवा अधिक प्रेयसी भेटल्या आणि तिच्यावरच किंवा त्यांच्यावरच त्यांनी आपल्या कविता लिहिल्या असा हा वाद आहे. काही समीक्षक गोविन्दाग्रजांची प्रेयसी ही वास्तविक प्रेयसी आहे असे सांगतात. त्यातही काहींच्या मते या वास्तवातल्या प्रेयसींची संख्या दोन होती. पण अन्य काही समीक्षकांच्यामते गोविन्दाग्रजांची ही प्रेयसी काल्पनिक असून प्रत्यक्षातल्या कुणा प्रेयसीने त्यांच्या हृदयाचा कबजा घेतलेला नव्हता.

गोविन्दाग्रजांच्या प्रेयसीला किंवा प्रेयसींना वास्तवातील व्यक्ती मानणारांचे मत आपण प्रथम लक्षात घेऊ. डॉ. वाळिंबे यांनी

गोविन्दाग्रजांचा दोनदा प्रेमभंग झाल्याचे म्हटले आहे. पहिला प्रेमभंग कर्जत येथे १९०० च्या सुमारास झाला आणि दुसरा १९१५-१६ च्या सुमारास झाला असे त्यांचे म्हणणे आहे. आपल्या "गडक-यांचे अंतरंग " या पुस्तकात त्यांनी गोविन्दाग्रजांच्या प्रेमप्रकरणाशी संबंधित विधाने ब-याच ठिकाणी केलेली आहेत. गोविन्दाग्रजांनी " शेवटचे प्रेमगीत " या कवितेत " सात वर्षे, सखे ! हर्षद स्वप्न जे पाहिले " असा जो सात वर्षांचा उल्लेख केलेला आहे त्यासंबंधी ते लिहितात, " या कवितेतील सात वर्षांचा उल्लेख गडक-यांच्या प्रेमप्रकरणालाच उद्देशून आहे यात कसलीच शंका नाही. सात वर्षांचा हा उल्लेख वस्तुस्थितीवरच आधारलेला आहे. "[१] " गडक-यांची प्रेमगीते म्हणजे त्यांच्या वैयक्तिक भावजीवनाची अगदी प्रामाणिकपणे व उत्कटपणे सांगितलेली कहाणी होय. ",[२] " प्रीतीच्या साफल्याचा हा दिव्य क्षण गडक-यांच्या जीवनात जुलै १९१५ पर्यन्तच्या काळात केव्हातरी येऊन गेला यात शंकाच नाही. "[३] अशी मते त्यांनी मांडली आहेत.

डॉ. वाळिंबे यांनी " वाग्वैजयंती "चे संपादन केलेले आहे. त्याला जोडलेल्या प्रस्तावनेत त्यांनी असेच विचार व्यक्त केलेले आहेत. आपल्या या प्रस्तावनेत ते लिहितात, " कला निर्मितीच्या प्रक्रियेचे हे स्वरूप मान्य केल्यावरही १९१६ मध्ये गडक-यांनी लिहिलेल्या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. डॉ. वाळिंबे, रा. शं., 'गडक-यांचे अंतरंग,' प्रथमावृत्ति जुलै १९५१, चित्रशाळा प्रकाशन पुणे, पृष्ठ ३१२.

२. तत्रैव, पृ. २३४.

३. तत्रैव, पृ. २७१.

बहुतेक प्रमुख प्रेमगीतांतील उत्कट भावनाविष्काराला वस्तुस्थितीतील घटनांचा व अनुभूतींचा आधार असला पाहिजे असेच मला आजही वाटत आहे."[१] " निर्वाणीची विनवणी", " हृदयास ", " एका शब्दासाठी विनंती ", " निर्दय बालेस " आणि " शेवटचे प्रेमगीत " या १९१६ मध्ये लिहिलेल्या पाच कवितांमधील कमालीच्या उत्कट भावनाविष्काराला वस्तुस्थितीतील घटनांचा व कवीच्या वैयक्तिक अनुभूतींचा आधार असलाच पाहिजे असे पुन्हा पुन्हा विचार करूनही त्यांना वाटते. " जुन्या कवितांची आठवण " आणि " फणसाचे पान " या कविताही कुणा व्यक्तीला उद्देशून लिहिल्याचे ते सांगतात.[२] डॉ.वाळिंबे यांनी गोविन्दाग्रजांच्या प्रेयसीचे नाव " तारा " असावे असे सुचविले आहे. आपल्या " गडकऱ्यांचे अंतरंग " या पुस्तकात त्यांनी यासंबंधी " त्याच तारकेस याचना " हे एक स्वतंत्र प्रकरणच लिहिले आहे [ पृ.१४९ ते १६३ ].

माधव गडकरी यांना गोविन्दाग्रजांच्या प्रेमप्रकरणात मोठा रस दिसतो. गोविन्दाग्रजांच्या कर्जत येथील प्रेमप्रकरणासंबंधी ते लिहितात, " प्रेमकवितांचा जन्म हा त्यांच्या प्रेमकहाणीतून झाला. त्या कहाणीचा उगम उल्हास नदीच्या तीरावरचा. तसे नसते तर "जुन्या कवितांची आठवण " ही कविता लिहिली नसती आणि फक्त तीन दिवस आधी त्यांनी " फणसाचे पान " ही कविताही लिहिली नसती."

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. डॉ.वाळिंबे रा.शं., "संपादक" वाग्वैजयंती " सातवी आवृत्ती एप्रिल १९६२, प्रकाशक नेरलेकर, पुणे, पृष्ठ २३.
२. तत्रैव, पृ. ३२.

"-----फणसाच्या पानावर गडक-यांनी तारुण्याच्या उमेदीने आपले नाव लिहिले, पण ते पान परक्याचे झाले. हे सर्व त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष घडले. त्याचेच हे चित्रण होते."[१] पुढे ते लिहितात, " त्यांची प्रत्येक कविता हे त्यांच्या जीवन प्रवासातील एक एक पाऊल आहे, आणि पुढील सात वर्षांच्या त्यांच्या प्रेमप्रकरणाची [ अल्लड प्रेमास ] ही कविता म्हणजे सुरुवात आहे........ कै. राम गणेश गडक-यांची चर्चिली जाणारी व त्यांच्या कवितेत प्रकट झालेली प्रेमप्रकरणे दोन. मातेबहीण चंपा देशपांडे ही पहिली प्रेयसी व कमला मोरोपंत जोशी ही दुसरी. पहिली उल्हासनदीच्या तीरावर बालपणीच भेटली व दुसरी फर्ग्युसन कॉलेजमध्ये सामोरी आली".[२] गडक-यांच्या कवितेत " तारा " हे प्रतीक अनेक वेळा येते. त्यावरूनच डॉ. वाळिंबे यांनी त्यांच्या प्रेयसीचे नाव " तारा " असावे असे सुचविले आहे. माधव गडकरी गोविन्दाग्रजांच्या कवितेत " आशा " हा शब्द असंख्यवेळा येतो असे सांगून लिहितात, " गडक-यांच्या हृदयात आशा व तारा यांचे तुंबळ युध्द चाललेले दिसते. हे शब्द अर्थामध्ये व्यत्यय आणतात, काही ठिकाणी रसभंग करतात व तरी ते येतात. त्यामुळे त्यांच्या येण्याचे प्रयोजन वेगळे असावे असे म्हणायला जागा राहते."[3] अन्यत्र ते म्हणतात, " १९०९ मधील " अल्लड प्रेमास " ही कविता त्यांच्यातील नव्या प्रेमसंबंधामुळे निर्माण झालेला उत्साह प्रगट करते. सप्टेंबर

---

१. गडकरी माधव, "राम गणेश गडकरी " प्रथमावृत्ती २६ सप्टेंबर १९८५, श्री विद्या प्रकाशन पुणे पृ. ३९-४०.

२. तत्रैव. पृष्ठ ९२ व ९५.

३. तत्रैव. पृष्ठ ९८.

१९११ मध्ये लिहिलेली " गुलाबी कोडे " ही कविता त्यांच्या आयुष्यातील प्रसंगातूनच निर्माण झालेली असावी. गडकऱ्यांच्या आयुष्यात कोणत्या तरी प्रेयसीचे चुंबन घेण्याचा प्रकार घडला असे मानावयास भाग पाडणाऱ्या अनेक कविता आहेत. "[१]

" लोकराज्यांच्या राम गणेश गडकरी जन्मशताब्दी विशेषांकात श्री नाचणोलकर यांनी " गडकरी व्यक्ती आणि त्यांची प्रेयसी " नामक लेख लिहिला आहे. या लेखात गडकऱ्यांच्या प्रेमप्रकरणासंबंधी काही मान्यवरांच्या त्यांनी घेतलेल्या मुलाखती नोंदविल्या आहेत. वाईचे राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांनी त्यांना " गडकऱ्यांचा प्रेमभंग झाला होता " असे सांगितले, तरी त्यांच्या प्रेयसीबद्दल इतर माहिती देण्यास स्पष्ट नकार दिला. मामा वरेरकरांनी त्यांना बरीच माहिती पुरविली. मामांनी त्यांना गडकऱ्यांचा प्रेमभंग झाला होता, हे तर सांगितलेच. शिवाय " गडकरी फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असता त्याच कॉलेज-मधल्या एका बुध्दिमान आणि देखण्या मुलीवर त्यांचे प्रेम बसले होते. तिचे पण गडकऱ्यावर प्रेम होते. परन्तु गडकरी कायस्थ व तिची जात अलग, या गोष्टी आड आल्या. अखेर ती खानदानी घराण्यातली मुलगी एका संस्थानिकाची पत्नी झाली. या मुलीच्या लग्नाची वार्ता कळताच गडकरी काही काळ वेडेपिसेही झाले. भणंग भिकाऱ्याप्रमाणे ते भटकू लागले आणि अखेरीस आत्महत्या करण्यासाठी १९०६ ला कुर्डुवाडी स्टेशनावर आले. " अशी 'आतली' माहिती दिली.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. तत्रैव, पृ. ९९-१००.

कुर्डुवाडीला नाटककार कोल्हटकर आणि गणपतराव बोडस यांनी त्यांना पाहिले. त्यांच्या बोलण्यातून परस्परांच्या कोटया - प्रतिकोटया झडू लागल्या आणि त्या आनंदाच्या भरात गडकऱ्यांचा आत्महत्येचा विचार कुठल्याकुठे पळाला असेही पुढे मामांनी सांगितले.[१] वि. सी. गुर्जरांनी नाचणोलकर यांना सांगितले की, " गडकऱ्यांच्या प्रेयसीचे नाव दोन अक्षरी होते. तिचे लग्न एका संस्थानिकाशी झाले. यामुळे राम वनवासी झाला. "[२]

गोविन्दाग्रजांच्या प्रेयसीचा शोध अन्य अनेकांनीही केलेला आहे. रा. ग. हर्षे लिहितात " ......... सात वर्षेपर्यन्त उराशी बाळगून ठेवलेली ही हर्षद आशा स्वप्नवत् ठरून प्रियतमेचा स्नेहसंबंध सर्वस्वी तुटल्यामुळे त्यांना शेवटचे प्रेमगीत लिहावे लागले आहे. "[३] हर्षे यांनी यात गडकऱ्यांचे हे प्रेमप्रकरण सात वर्षे चालले होते असे सूचित केले आहे. भाऊसाहेब खांडेकर लिहितात, " या चरणांवरून विशेषत: त्यातील सात वर्षांच्या कालविषयक उल्लेखावरून या पुनर्जात प्रेमाचा प्रवाह १९०९ ते १९१६ पर्यन्त वाहत असावा असे वाटते............१९१६ त लिहिलेल्या कवितांवरूनही १९१६ मध्ये त्यांच्या आशावृक्षांवर दुर्दैवाने पुन्हा घाला घातला असावा अशी शंका येते. "[४] प्रा. भ. श्री. पंडितांना " गोविन्दाग्रजांची ही

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. नाचणोलकर अ. ल., "लोकराज्य", गडकरी विशेषांक, १९८५, पृ. ३१
२. तत्रैव पृ. ३२.
३. हर्षे रा. ग., "गोविन्दाग्रज"प्रथमावृत्ती, साहित्य-सेवक-संघ, पृ. ८४.
४. खांडेकर वि. स., "गडकरी : व्यक्ती व वाङ्मय", पृष्ठ८१-८२.

प्रणयपूरित गीते पूर्णपणे काल्पनिक असावीत असे त्यांच्यातील अंत:स्वत्त्वा-वरून [ स्पिरिट ] वाटत नाही. "[१] त्यांनी गोविन्दाग्रजांच्या कवितांतील प्रेयसी हिराबाई पेडणेकर होती, असे मत व्यक्त केले आहे.[२] खापर्डे गोविन्दाग्रजांना " प्रेमभंगाचे कवी " असेच संबोधतात.[३] त्र्यं. वि. सरदेशमुख लिहितात, " गोविन्दाग्रजांनी प्रेम केले ते साक्षात कोणा व्यक्तीवर : प्रेमावर प्रेम करणे त्यांना कधीच साधले नाही. "[४] गोविन्दाग्रजांची कविता केवळ आत्मनिष्ठ नाही तर ती आत्मपर आहे असा निष्कर्ष मराठीतील बहुसंख्य समीक्षकांनी काढला आहे. राजाध्यक्ष, पराडकर, डॉ.तारा भवाळकर आदींचेही तसेच मत आहे.

दुसरा पक्ष गोविन्दाग्रजांची कोणी प्रेयसी होती हे मानावयास तयार नाही. आचार्य अत्रे यांनी गडक-यांचे प्रेमप्रकरण शोधण्याचा प्रयत्न केल्याबद्दल डॉ.वाळिंबे यांच्यावर टीकेचा भडिमार केला आहे. " अप्रकाशित गडकरी " या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यांनी गडक-यांची प्रेमकाव्ये वाचून काही टीकाकारांनी गडकरी हे स्वत: कोणा तरी " सुंदरीच्या " प्रेमात पडले असले पाहिजेत असा जो निष्कर्ष काढला आहे तो अतिशय वेडगळपणाचा आहे असे सांगितले आहे. " याला साहस कोण म्हणणार नाही ?" या

---

१. प्रा. पंडित भ. श्री., " वाग्वैजयंती मधील प्रेमकविता ", सत्यकथा १९६३
२. प्रा. पंडित भ. श्री., " संचय ", पुणे. १९६८, पृष्ठ १३४-१३५.
३. खापर्डे ब. ग., "गोविन्दाग्रज " नागपूर, १९५४, पृ. १६-१७.
४. प्रा. सरदेशमुख त्र्यं. वि. "अंधारयात्रा" पहिली आवृत्ती १९६८, मौज प्रकाशन, पृ. ५६.

गडक-यांच्या कथेचा नायक हरिहर हा आहे. या हरिहरचे वर्णन करताना गडकरी म्हणतात, " प्रणयिनीवाचून तो प्रणयी झाला होता. विरहावाचून तो विरहव्यथा अनुभवती होता. जग त्याला उदास भासत होते. प्रेमशून्य जीविताला तो कंटाळला होता. "[१] हरिहराचे हे शब्द उद्धृत करुन आचार्य अत्रे लिहितात, " यावरुन ' प्रणयवेडा ' होण्यासाठी कवीला हमखास प्रणयिनीच लागते ही जी टीकाकरांची कल्पना आहे ती किती वेडगळ आहे हे दिसून येते. "[२]

व. शां. देसाई यांनाही गडक-यांची कुणी प्रेयसी होती ही भूमिका मान्य नाही. ते लिहितात, " गडक-यांच्या खडतर जीवनक्रमात कमतरता होती, म्हणूनच की काय, त्यात प्रेमभंगाचे दु:ख कालविण्याचा काही " कल्पनाशील " लेखकांनी प्रयत्न केला आहे........प्रेमभंगावर कविता करण्यासाठी कवीला स्वानुभवाची गरज असते. असे नाही. "[३] डॉ. मधुकर आष्टीकर यांनीही " गडक-यांच्या प्रत्येक कृतीत त्यांच्या जीवनातल्या या व्यथाच परिणत होतात हा सिध्दान्त ठरेल का ? " असा प्रश्न केला आहे.[४] प्रा. वसंत बापट गडक-यांची प्रेयसी शोधण्याचा प्रयत्न करणा-या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. गडकरी रा. ग. "अप्रकाशित गडकरी", पृष्ठ ४.
२. अत्रे प्र. के. "अप्रकाशित गडकरी", मोटे प्रकाशन, पृष्ठ चोवीस.
३. देसाई व. शां. "गडक-यांची नाट्यसृष्टी", मुंबई, १९८२, पृष्ठ१२.
४. डॉ. आष्टीकर मधुकर, " अप्रकाशित वाङ्मयातून गडकरी दर्शन " धर्मभास्कर, गडकरी विशेषांक १९८४, पृष्ठ १९.

संशोधकांबद्दल म्हणतात, " त्यांच्यामधील संशोधकाने त्यांच्यामधील आस्वादकावर मात केली आणि मग ते भलतीकडेच भरकटत गेले. गडकऱ्यांच्या अज्ञात प्रेयसीचा छडा लावून तिला या मराठीच्या नगरीतल्या चावडीवर दाखल करायचा त्यांनी चंग बांधला. "[१]

गोविन्दाग्रजांच्या या एकूण प्रेमप्रकरणासंबंधी विचार करता मला त्यांच्या जीवनात कर्जत येथे घडलेला प्रेमप्रसंग खरा वाटतो. "जुन्या कवितांची आठवण " या कवितेत गोविन्दाग्रज सांगतात,

" सारया त्या कविता तशाच असती; ते अर्थही त्यापरी ।
शाळाही अजुनी नवीच दिसते त्या रम्य जागेवरी ।।
x x ! वाहतसे भरुनि दुथडी " उल्हास ", तेव्हा जशी ।
गेला वाहुनि काळ तो, सकळ ती सौख्येहि त्यांची तशी ।।

. . . . .

विद्यादानि नसे विशेष गति त्या बाल्यात आम्हा तशी ।
प्रेमाचा पहिला धडा गिरविला निर्दोषिशा मानसी ।।"

" फणसाचे पान " या कवितेत फणसाचे पान पाहून गोविन्दाग्रजांना आपल्या पूर्वप्रेमाची आठवण होते आणि मग ते लिहितात,

" फणसाच्या त्या पानावरती दिसल्या ज्या मज रेषा ।।
कधीकाळच्या उघडुनि दाविति मनिच्या अंतरवेषा ।।

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. प्रा. बापट वसंत " धर्मभास्कर " गडकरी विशेषांक १९८४, पृष्ठ ८०.

लिहुनि ठेविली पूर्ववयामधि कथा गोड जी पानी ।।
पुन्हा वाचिली; - आणि जाहला सखेद हर्षहि रमणि।

. . . . . . .

डोळे झाकुनि भरभर फिरली कथा वाचिली मग ती ।।
हतभागी हे जीव जगी या स्मरणे केवळ जगती ।।
गाव कुणाचे ? नाव कुणाचे ? - आणि कुणाचे पान ? ।।
सरोवराला परका मधुकर करित रसाचे पान ।।"

गोविन्दाग्रजांनी या दोन्ही कविता बोरिवली येथे १९१८ मध्ये लिहिल्या आहेत हे विशेष-करुन लक्षात घ्यावे लागते. याच प्रेमास उद्देशून त्यांनी " जुन्या प्रेमास ---" ही कविता लिहिली आहे. " समीक्षक " मासिकाच्या गडकरी विशेषांकात ती प्रसिध्द झाली आहे. या कवितेत गोविन्दाग्रज सांगतात,

प्रेमाची भाषणे परिसता किंवा वदता तद्विषयी,
तुझी स्मृति क्षणमात्र होत मज, लहरी लाजवि जी हृदयी।
तुटला आता ऋणानुबंधचि — कुणी कुणाचे जरि नाही,
तरी न विसरे जीव — आपुले गूढ असे जे मनि काही।
नवी बंधने तुला लाभली — आणि लाभतिल तशी मला,
परंतु गेली पहिली प्रीति — प्रीती प्रतिपद चंद्रकला।
व्यवहाराची बुध्दि मन्मना तुजपासुनि ओढुनि नेई,
मदिरेची ही भ्रष्ट दिव्यता स्वतंत्रता मजला देई। "

वर उल्लेखलेल्या तीन कवितांत स्थळादींचे व अन्य जे उल्लेख आलेले आहेत त्या आधारे गोविन्दाग्रजांना कर्जतला असताना प्रेमाचा

प्रत्यक्ष अनुभव आला होता असे म्हणता येते. त्यांच्या या प्रेमप्रकरणावर गडक-यांचे स्नेही नाट्यछटाकार दिवाकर यांची अप्रकाशित दैनंदिनी मोठा प्रकाश टाकते. दिवाकरांनी आपल्या या दैनंदिनीमध्ये २९ नोव्हेंबर १९१९ व ३१ ऑगस्ट १९२१ या तारखांना केलेल्या नोंदीनुसार रामचंद्र रंगराव तथा बाबूराव देशपांडे या आपल्या मामेभावाच्या मोठया बहिणीवर गडक-यांचे प्रेम होते, परन्तु गडक-यांनीच दुस-या मुलीशी लग्न केल्याने तिचे दुस-या तरुणाशी लग्न झाले. आपल्या पहिल्या लग्नाची खासलात लागल्यानंतर देशपांडयांच्या चौथ्या बहिणीला गडक-यांनी मागणी घातली होती, परन्तु ती तिच्या वडिलांना मान्य झाली नाही."[1] देशपांडयांच्या उभय बहिणींपैकी कुणाचेही नाव " तारा " असल्याचे दिसत नाही, अशी माहिती डॉ. स. गं. मालशे हे देतात.[2]

गोविन्दाग्रजांच्या दुस-या प्रेमप्रकरणाबद्दल दिल्या गेलेल्या माहितीत मात्र फार मोठी विसंगती आणि धरसोड आढळून येते. त्यांचे हे प्रेमप्रकरण सात वर्षे चालले होते असे स्वत: कवीनेच केलेल्या सात वर्षांच्या उल्लेखावरुन समीक्षकांनी भलभलते तर्क केलेले आढळतात. डॉ. वरळिंबे यांनी या प्रेमप्रकरणाबद्दल आपल्याला "शंका नाही" असे दोन तीन ठिकाणी म्हटले असले तरी, एकंदरीत त्यांच्या म्हणण्यात ठामपणा आढळत नाही. एकीकडून शंका नाही म्हणावयाचे आणि

---

१. डॉ. कुलकर्णी भीमराव, "संपूर्ण गडकरी", खंड-१, नवी आवृत्ती १९८४ सरिता प्रकाशन, प्रस्तावना पृष्ठ सत्तरमधून.

२. डॉ. मालशे स. गं., प्रस्तावना, "गडकरी सर्वस्व" पृष्ठ १४.

दुसरीकडून, " १९१५ च्या एप्रिलच्या सुमारास एखाद्या मुलीशी
तिने त्यांच्या प्रेमभावनांना प्रतिशब्द ही दिला असेल काय?
गडकऱ्यांचा बराच परिचय झाला असेल काय ?"[1] " ही कविता [ निर्दय बालेस ] त्यांनी १९१६ च्या मार्चच्या अखेर लिहिली असावी. या काळात सौंदर्याच्या वंचना-कौशल्याची प्रतीती येण्यासारखा काही प्रसंग गडकऱ्यांच्या जीवनात खरोखर घडलेला असेल काय ?"[2] अशा साशंकतेने वेढलेल्या प्रश्नांची फैर करावयाची आणि " पूर्व वयात एखाद्या मुलीशी गडकऱ्यांचा बराच परिचय होऊन त्या परिचयाला प्रेमभावनेचे स्वरूप जर खरोखर आले असेल तर ......"[3], " प्रेमगीतांतील भावना गडकऱ्यानी सत्य सृष्टीतील व्यक्तीला उद्देशून प्रकट केल्या असोत अथवा नसोत"[4] अशी डळमळीत विधाने करावयाची. पुन्हा हे प्रेम १९१५-१६ च्या सुमारास जुळले असे सांगून १९०९ पासून या प्रेमाचा सात वर्षांचा हिशेब द्यावयाचा. या साऱ्याला संशोधनाच्या क्षेत्रात तोड असेल असे मला वाटत नाही.

गोविन्दाग्रजांच्या या दुसऱ्या प्रेमप्रकरणाची माहिती देताना समीक्षकांनी त्यांच्या जीवनातील घटनांच्या कालानुक्रमाकडे पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे. गोविन्दाग्रज फर्ग्युसन कॉलेजमध्ये कोणत्या

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१. डॉ. वाळिंबे रा. शं., " गडकऱ्यांचे अंतरंग ", प्रथमावृत्ती पृ. २६३
२. तत्रैव, पृ. १९८
३. तत्रैव पृ. १७५.
४. डॉ. वाळिंबे रा. शं., "वाग्वैजयंती", सातवी आवृत्ती, प्रस्तावना, पृष्ठ ३३.

वर्षी गेले ? त्यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रथम १९०४ मध्ये व नंतर १९११ मध्ये प्रवेश घेतलेला दिसतो. या दोन्ही वर्षांचा गोविन्दाग्रजांनी १९१६ साली सांगितलेल्या सात वर्षांच्या प्रेमकहाणीशी ताळमेळ बसत नाही. त्यांची प्रेयसी कोण ? तिच्या नावासंबंधी निश्चिती नाही. त्यात पुन्हा सात वर्षांची प्रेमकहाणी उलगडताना कर्जतच्या प्रेमप्रकरणाचा हवाला द्यावयाचा. हे सारेच गौडबंगाल वाटते. मामा वरेरकर यांनी दिलेल्या माहितीला कोणताही आधार नाही आणि १९०६ पूर्वी कुणी खानदानी घराण्यातली मुलगी गडकऱ्यांना भेटण्याची सुतराम शक्यता नाही. ?

गोविन्दाग्रजांनी १ जून १९१६ रोजी लिहिलेल्या " शेवटचे प्रेमगीत " या आपल्या कवितेत म्हटले आहे.

" तुटे स्नेहसंबंध सर्वस्वि आता । टाकिता तू असे या अनाथा ।।
सात वर्षे सखे । हर्षद स्वप्न जे । पाहिले भोगिले तेच आता ।।"

या ओळीतील सात वर्षे हा शब्द पकडून समीक्षकांनी गोविन्दाग्रजांचे प्रेमप्रकरण उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि एकाही समीक्षकाला या सप्तवर्षीया प्रेमबालिकेचे सुसंगत चित्र उभे करता आलेले नाही. आणि कवीचेच शब्द घट्ट धरून सात वर्षांचा इतिहास सांगायचा, तर त्याच कवीने लिहिलेल्या " ती कोण ?" या कवितेतील भावार्थही डावलता येणार नाही. या कवितेत गोविन्दाग्रज म्हणतात,

" जी माझ्यास्तव, मी जिचे सकलही; आधार जी जीवनी
देवा। भेटवि-दाखवी तरि मला ती कोण देवी जनी ?"

ही कविता ऑगस्ट १९१४ मध्ये लिहिलेली आहे. आता कवीचेच शब्द घेऊन बोलायचे तर ती तथाकथित देवी त्याला अजून दिसलेली नाही. कारण ती देवी या जगात कोठे आहे ती दाखव आणि तिची भेट घडवून आण, अशी त्याने देवाला येथे प्रार्थना केलेली आहे. गोविन्दाग्रजांना ही देवी १९१४ पर्यन्त जर भेटलीच नाही, तर १९१६ पर्यन्त त्यांची प्रेमकहाणी सात वर्षांची कशी काय ठरणार ?

या सात वर्षांच्या उल्लेखाबद्दल खांडेकरांनी दोन कल्पना मांडलेल्या आहेत. पहिली कल्पना म्हणजे हा कालोल्लेख पुनर्जात प्रेमप्रवाहाशी संबंधित असावा आणि दुसरी कल्पना म्हणजे गोविन्दाग्रजांनी आपल्या कवितेचा घेतलेला निरोप त्यात सुचविलेला असावा. खांडेकर लिहितात, " १९०९ मध्ये गडकऱ्यांची कविता प्रसिध्द व्हावयाला सुरवात झाली; १९१६ मध्ये "पुण्यप्रभाव" रंगभूमीवर आल्यानंतर नाटयलेखनाला स्वत:ला वाहून घेण्याचे निश्चित करुन गडकऱ्यांनी कवितेचा जवळजवळ कायमचा निरोप घेतला. सदरहू कवितेतील सात वर्षांच्या काळाचा असा अर्थ लावणे अशक्य नाही. "[१] खांडेकरांनी मांडलेल्या या दोन कल्पनांपैकी डॉ.वाळिंबे यांना पहिलीच बरोबर वाटते, मला मात्र दुसरी कल्पना वास्तवदर्शी आहे असे वाटते. गोविन्दाग्रजांची " शेवटची कविता " समीक्षक मासिकाच्या गडकरी विशेषांकात प्रसिध्द झाली आहे. या कवितेला त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावात ते म्हणतात,

---

१. खांडेकर वि.स., " गडकरी: व्यक्ती व वाङ्मय ", पृष्ठ ९.

" शेवटची कविता! माझी शेवटची कविता! तिला प्रस्तावना काय लिहू? माझी उद्याची अनाथ कवितादेवी -- देवि, तूच काय लिहावयाचे ते लिही!"

हा प्रस्ताव पुष्कळच बोलका आहे असे मला वाटते.

गोविन्दाग्रजांनी आपली " वाग्वैजयंती " " श्री हृदयशारदेस " अर्पण केलेली आहे. ही श्री हृदयशारदा कोण, यासंबंधी कै. कृ. रा. परांजपे यांनी काही वेगळेच मत मांडले आहे. त्यांच्या मते ही हृदयशारदा कोणी मानवी व्यक्ती नसून ती एक प्रेरकशक्ती असावी. ती " ज्ञानेश्वरी " असावी असे त्यांचे म्हणणे आहे. हा दृष्टिकोन स्वीकारून त्यांनी गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितांचे विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते हृदयशारदेस या कवितेतील " तारा म्हणजे मायामोहातून तारून नेणारी आणि विश्वैक्य वृत्तीची दिशा दाखविणारी ज्ञानेश्वरी होय. "[१] ते लिहितात, " गोविन्दाग्रज प्रेमाचे शाहीर होते, अशी जी सर्वसामान्य समजूत आहे, ती सत्य असली तरी या वैजयंतीत प्रेमाचे कोणते प्रकार गायिले आहेत याबद्दल मात्र टीकाकारांत जितक्या भिन्न समजुती आहेत तितक्याच गैरसमजुतीपण दुर्दैवाने झाल्या आहेत. यामुळे गोविन्दाग्रजांच्या काव्यात काही लोकांना कामुक प्रेम दिसते, तर काहींना निराशप्रेम दिसते, तर काहींना स्वैरप्रेम आणि काहींना तर प्रेमाचे ढोंग देखील आहे असे वाटते. बारकाईने व सहानुभूतीने

---

१. परांजपे कृ. रा., " गोविन्दाग्रजांची गूढगीते " प्रथमावृत्ती १९८८ कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पृष्ठ ४३.

गोविन्दाग्रजांच्या काव्याचे परिशीलन केल्यास असे आढळून येईल की त्यांच्या काव्यात सापेक्ष प्रेमापासून निरपेक्ष विश्वप्रेमापर्यंन्त सर्व प्रकारच्या प्रेमपरंपरेचे दर्शन होते. "[१]

गोविन्दाग्रजांच्या प्रेमप्रकरणाचा काहीशा विस्ताराने मी आढावा घेतलेला आहे. बहुसंख्य समीक्षकांनी त्यांच्या प्रेमप्रकरणाच्या संदर्भातच त्यांच्या प्रेमकवितांचे विवेचन केलेले असल्यामुळे विस्तारानेच त्याचा विचार करावा लागला. माझ्या मते कर्जत येथील प्रेमप्रकरण ही एक वास्तव घटना आहे. तिच्याशी संबंधित ज्या तीन कविता आहेत, त्यांचा अर्थ त्या प्रसंगांच्या अनुरोधाने लावता येतो. तथापि १९०९ नंतर त्यांनी लिहिलेल्या अन्य कवितांचा कुठल्या वास्तव प्रेयसीशी संबंध असेल असे मला वाटत नाही. गोविन्दाग्रजांनी त्या त्या वेळी मनात दाटून आलेल्या आपल्या विविध भाववृत्ती या कवितांतून व्यक्त केल्या आहेत, असे मला वाटते. भाववृत्तींचा विविधांगी आविष्कार हेच गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितेचे स्वरुप आहे. कै. परांजपे यांनी " श्री हृदयशारदा " म्हणजे " ज्ञानेश्वरी " असे जे मत व्यक्त केले आहे ते मला मान्य नसले तरी, " त्याच्या काव्यात सापेक्ष प्रेमापासून निरपेक्ष विश्वप्रेमापर्यंन्त सर्व प्रकारच्या प्रेमपरंपरेचे दर्शन होते " असा जो त्यांनी गोविन्दाग्रजांच्या प्रेम-कवितासंबंधी अभिप्राय व्यक्त केला आहे तो ब-याच प्रमाणात खरा आहे असे माझे मत आहे.

---

१. तत्रैव पृष्ठ ६९.

गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितांचा अभ्यास करताना दोन पथ्ये सांभाळली गेली पाहिजेत, असे मला वाटते. एक म्हणजे त्यांच्या कवितांचा केवळ काव्यदृष्टीनेच विचार झाला पाहिजे. पुष्कळदा समीक्षक नाटकांचा विचार आला की, " जयन्ता"त कवी गोविन्दाग्रजांचे प्रतिबिंब शोधायला लागतात आणि काव्याचा विचार आला की त्यात गडक-यांचे नायक पाहायला लागतात. खरे म्हणजे गडक-यांची नाट्यप्रतिभा काव्यात्मकतेने जितकी प्रभावित झाली आहे, तितकी गोविन्दाग्रजांची कविप्रतिभा नाट्यात्मकतेने प्रभावित झालेली नाही. त्यामुळे वाग्वैजयंतीच्या आधारानेच गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितेचे विशेष पाहणे योग्य ठरेल. दुसरे म्हणजे गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितांचा विचार करताना उठसूठ त्यांच्या प्रेयसीचा शोध घेत कामा नये. समीक्षक गोविन्दाग्रजांची ही प्रेयसी कोण, कोठली, तिचे नाव काय आणि तिच्याशी त्यांचे प्रेम केव्हा जुळले याच पोलिसी शोधात अकारण गुरफटले गेले आहेत. त्यामुळे नको त्या गोष्टींवर भर दिला जातो आणि आवश्यक ते गुदमरले जाते, गोविन्दाग्रजांच्या काव्यास्वादाच्या दृष्टीने ही गोष्ट फारशी इष्ट नाही. ही तथाकथित वैभरंवशाची प्रेयसी बाजूला काढून प्रेमवृत्तीचा एक आविष्कार या दृष्टीनेच त्यांच्या कवितांचा अभ्यास झाला पाहिजे.

निष्कर्ष

१] प्रत्येक समाजातील साहित्यात प्रेमकविता हे साहित्यनिर्मितीचे आदिपर्व असते. प्रेमभावना सनातन- पुरातन आणि म्हणून मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ भावना आहे. अशा या प्रेमकवितेच्या

निर्मितीमध्ये मराठी कवींत गोविन्दाग्रजांचे काही आगळे वेगळे स्थान आहे. उत्कट प्रेमभावनेचा आविष्कार हे गोविन्दाग्रजांच्या कवितेचे व्यवच्छेदक वैशिष्टय होय.

२] गोविन्दाग्रजांचे एकूण जीवनच अस्थिर आणि अशांत असे दिसते. तथापि या अस्थिरतेतही नाटककार, कवी आणि विनोदी लेखक या त्रिविध नात्यांनी मराठी साहित्यात त्यांनी अढळ स्थान मिळविलेले आहे. त्यांच्या अस्सल आणि उत्कट काव्यनिर्मितीचा प्रारंभ १९०९ मध्ये झाला आणि त्यांच्या मृत्यूपर्यन्त तो टिकला.

३] गोविन्दाग्रजांच्या आता एकूण १४९ कविता प्रकाशित झाल्या आहेत. त्यांतील काही अपूर्ण व काही त्रुटित आहेत. काही कविता प्रासंगिक स्वरूपाच्या आहेत, तर काही रूपांतरित किंवा अनुकरणात्मक आहेत. गोविन्दाग्रजांच्या कवितेचा मोठा प्रांत प्रेमकवितांनी व्यापला आहे. त्यांच्या प्रेमकवितांची संख्या पन्नासहून अधिक आहे.

४] प्रेमवृत्ती ही गोविन्दाग्रजांच्या कवितेची मूलगामी वृत्ती आहे. "वाग्वैजयंती"त या प्रेमवृत्तीची अनेक रूपे आढळतात. गोविन्दाग्रजांनी मानवी जीवनातील प्रेमाचे महत्त्व अनेक जागी सांगितले आहे. सावधप्रेम, निरभिलाषप्रेम, साभिलाषप्रेम, निराशप्रेम, दोलायमान प्रेम, मुग्ध शृंगाराने विनटलेले प्रेम, शारीरप्रेम, भक्तीच्या पातळीवर पोहोचलेले प्रेम — अशी प्रेमाची विविध रूपे गोविन्दाग्रजांच्या "वाग्वैजयंती"त आढळतात. गोविन्दाग्रजांनी प्रेमवृत्तीचा आविष्कार

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

करणारी काही नाट्यगीते लिहिलेली आहेत, रूपक कथा सांगितल्या आहेत आणि प्रेमपर शोकात्म कथाकाव्ये लिहिली आहेत. प्रेमभावनेच्या अशा विविध छटा गोविन्दाग्रजांच्या कवितांत आढळतात.

५] गोविन्दाग्रजांचे प्रेमप्रकरण हा मराठी समीक्षकांचा मोठ्या कुतूहलाचा विषय झालेला आहे. गोविन्दाग्रजांचे किती प्रेमभंग झाले, त्यांच्या प्रेयसीचे नाव काय, ती कुठली, त्यांची ही प्रेमक्रीडा किती वर्षे चालली होती इत्यादी गोष्टींत या समीक्षकांनी मोठा रस घेतलेला आहे. त्यांनी त्यांच्या दुस-या प्रेमप्रकरणासंबंधी पुरविलेली माहिती परस्पर विसंगत आणि धरसोडीची झालेली आहे.

६] गोविन्दाग्रजांचे ते कर्जत येथे असताना एक प्रेमप्रकरण घडले, हे अन्तर्बाह्य पुराव्याने सिध्द होते. तथापि या प्रेमप्रकरणाचा १९०९ ते १९१६ या सात वर्षांतील गोविन्दाग्रजांच्या कवितेशी कोणताही संबंध नाही.

७] गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितांचा अभ्यास करताना दोन पथ्ये बाळगली पाहिजेत असे वाटते. त्यांच्या प्रेमकवितांचा अभ्यास करताना गडक-यांच्या नाटकांशी त्यांचा संबंध जोडणे तितकेसे इष्ट होणार नाही आणि दुसरे म्हणजे त्यांच्या १९०९ ते १९१६ या काव्यनिर्मितीच्या सुवर्णयुगातील प्रेमकवितांचा रसास्वाद घेताना त्यांच्या प्रेयसीच्या संशोधनाचा सतत पाठपुरावा करणे योग्य होणार नाही. या संशोधनातून आपल्या हाती काहीही लागत नाही. मराठी समीक्षकांतील संशोधकाने त्यांच्यामधील आस्वादकावर मात केल्याने ते भलतीकडेच भरकटत गेलेले दिसतात. गोविन्दाग्रजांच्या प्रेमकवितांचा खरा रसास्वाद या दोन पथ्यांच्या पालनानेच प्राप्त होण्याजोगा आहे.

== ० == ० ==